ILO/Japan
Multi-bilateral
Programme

International
Labour
Organization

# "मूलभूत आर्थिक साक्षरता" या विषयावर समुदाय - आधारित अभ्यास साधन

## प्रेरकांसाठी मार्गदर्शक पुस्तिका

महिला उद्योजकता विकास व लिंगसमभाव
रोजगार निर्मिती व उद्योग विकास विभाग

आयएलओ डिसेन्ट वर्क टीम - बँकॉक आंतरराष्ट्रीय श्रम संघटना

कम्युनिटी - बेसड् एन्टरप्राईज डेव्हलपमेंट (सी-बीइडी) ॲस्पायरींग आंत्रप्रनर करीता इंटरनॅशनल लेबर ऑरगनायझेशन (आयएलओ)/सी-बीइडी द्वारा क्रिएटीव कॉमन्स ॲट्रीब्युशन - नॉन - कमर्शीयल शेअर अलाइक ३.० अनपोर्टेड लायसेन्स अंतर्गत.

प्रकाशन हक्क © आंतरराष्ट्रीय श्रम संघटना २०१७
प्रथम प्रकाशित (२०१७)

आंतरराष्ट्रीय श्रम कार्यालयाची प्रकाशने, जागतिक प्रकाशन अधिवेशनाच्या, प्रोटोकॉल २ अंतर्गत छापण्यात येतात. तथापि, स्रोताबाबत माहिती देण्याच्या अटीवर, यातील काही छोटे उतारे अधिकृत मान्यतेशिवाय पुनर्मुद्रित करता येऊ शकतात. भाषांतराच्या पुनर्मुद्रण हक्क प्राप्त करण्याकरिता, आय एल ओ प्रकाशने (हक्क आणि परवानगी), आंतरराष्ट्रीय श्रम कार्यालय, सी एच-१२११, जीनिव्हा २२, स्वित्झर्लंड येथे अर्ज करावा. अथवा, pubdroit@ilo.org इथे ई-मेल करावा. अशा अर्जांचे आंतरराष्ट्रीय श्रम कार्यालय नेहमी स्वागतच करते.

ज्या ग्रंथालयांनी अथवा संस्थांनी पुनर्मुद्रण हक्क संघटनांमधे नोंदणी केली आहे, ते, त्यांना याकरिता जारी करण्यात आलेल्या परवान्यानुसार नक्कलप्रत तयार करू शकतात. तुमच्या देशातील पुनर्मुद्रण हक्क संस्था शोधण्याकरता www.ifrro.org या संकेतस्थळाला भेट द्या.

---

९७८-९२-२-८३१३४५-१ (वेब पीडीएफ)

---

आय एल ओच्या प्रकाशनातील पदनियुक्त, जे संयुक्त राष्ट्र संघाच्या कार्यपद्धतीशी सुसंगत आहेत, तसेच सादर करण्यात आलेले मजकूर सादरीकरण, आंतरराष्ट्रीय श्रम कार्यालयाच्या कोणत्याही देशाच्या, क्षेत्राच्या किंवा प्रदेशाच्या कायदेशीर स्थितीबद्दल, अथवा त्यांचे अधिकार, अथवा त्यांच्या सरहद्दीच्या परिसीमांबाबत कोणतेही मतप्रदर्शन सूचित करत नाहीत.

मुद्रित लेख, अभ्यासलेख तसेच अन्य साहित्यातून मांडण्यात आलेल्या मतांसाठी केवळ लेखक जबाबदार आहे. तसेच त्या लेखातील मजकूरांना आंतरराष्ट्रीय श्रम कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारची मान्यता देण्यात आलेली नाही.

कंपन्यांची नावे तसेच व्यावसायिक उत्पादने तसेच प्रक्रिया यांना आंतरराष्ट्रीय श्रम कार्यालयाकडून मान्यता आहे असे सूचित होत नाही, त्याचप्रमाणे एका विशिष्ट कंपनीचा, व्यावसायिक उत्पादनाचा तसेच प्रक्रियेचा उल्लेख करण्यात आला नसल्यास त्याला मान्यता नाही असेही सूचीत होत नाही.

आय एल ओ ची प्रकाशने आणि इलेक्ट्रॉनिक उत्पादने प्रमुख पुस्तकविक्रेत्यांकडे अथवा अनेक देशांतील आय एल ओ स्थानिक कार्यालयात उपलब्ध आहेत, अथवा, आंतरराष्ट्रीय श्रम कार्यालय, सी एच-१२११, जीनिव्हा २२, स्वित्झर्लंड इथून थेट मागवू शकतात. प्रकाशनांची सूची अथवा नवीन प्रकाशनांची यादी वरील पत्त्यावर विनामूल्य उपलब्ध आहे. किंवा pubvente@ilo.org येथे ईमेल करून मागवू शकता.

www.ilo.org/publns या संकेतस्थळाला भेट द्या.

---

# “मूलभूत आर्थिक साक्षरता” या विषयावर समुदाय – आधारित अभ्यास साधन

## प्रेरकांसाठी मार्गदर्शक पुस्तिका

International
Labour
Organization

महिला उद्योजकता विकास व लिंगसमभाव
रोजगार निर्मिती व उद्योग विकास विभाग

आयएलओ डिसेन्ट वर्क टीम – बँकॉक आंतरराष्ट्रीय श्रम संघटना

कम्युनिटी – बेसड् एन्टरप्राईज डेव्हलपमेंट (सी–बीइडी) ॲस्पायरींग आंत्रप्रनर करीता इंटरनॅशनल लेबर ऑरगनायझेशन (आयएलओ)/सी–बीइडी द्वारा क्रिएटीव कॉमन्स ॲट्रीब्युशन – नॉन – कमर्शीयल शेअर अलाइक ३.० अनपोर्टेड लायसेन्स अंतर्गत.

## समुदाय आधारित उद्योग विकास (सी-बीइडी) कार्यक्रमासंबंधी

सी-बीइडी प्रशिक्षण कार्यक्रम हा स्वयं-प्रेरणा आणि सामूहिक शिक्षण तंत्रावर आधारित अभिनव साधन आहे. सध्याच्या व इच्छुक उद्योजकांमध्ये व्यावसायिक कौशल्याची निर्मिती करणे, हा त्यामागचा उद्देश आहे.
सी-बीइडीमुळे समाजामध्ये सुरक्षित शैक्षणिक वातावरण तयार करण्यासाठी प्रचलित ज्ञानामध्ये वाढ होते. त्यातील शिकवणुकीचा वापर सहभागी प्रत्यक्ष व्यवसायामध्ये येणाऱ्या अडचणी सोडण्यासाठी करू शकतो.
सी-बीइडीला बाह्य तज्ज्ञांची गरज नाही. समाजातील किमान साक्षर सदस्य आपला काही वेळ देऊन अभ्यासक्रमातील स्वतंत्र घटकांची ओळख करून देऊ शकतो. अशा प्रकारे, सी-बीइडी हे शिस्तबद्ध व आव्हानात्मक वातावरणामध्ये कौशल्य विकास संधी उपलब्ध करून देते. विशेषत: उपेक्षित क्षेत्र आणि वादातील क्षेत्र किंवा आपत्तीनंतरचे क्षेत्र, जेथे शिक्षक व अध्यापक यांची उपलब्धता नसणे सामान्य बाब आहे, तेथे या प्रशिक्षणाचा उत्तम उपयोग होईल.

अभ्यासक्रमात कृती-आधारित धडे, आकृती व चित्रे यांचा जास्तीत जास्त वापर केला असून शिक्षित व अशिक्षित सहभागींनी एकत्रितपणे शिकण्याचा उद्देश आहे. ही पर्यायी शिक्षण पद्धती, नेतृत्वक्षमतेत वाढ करण्याच्या आणि सहभागींना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने निर्माण केली आहे. वैयक्तिक सुधारणा करण्याची इच्छा व समूह बांधणीसाठी प्रेरणा मिळणे हे कोर्स अखेरीस अपेक्षित आहे.
कमीत कमी क्षमता असणाऱ्या समाजामध्ये आणि त्यांच्या स्थानिक गरजांप्रमाणे बदल करून सुलभपणे राबविता येईल अशी कमी खर्चाची लवचिक रचना सी-बीइडीची करण्यात आली.

## प्रेरकांसाठी संदेश

१. तुमची ओळख आणि प्रशिक्षणाचे उद्दिष्ट अत्यंत महत्त्वाचे आहे! **परिशिष्ट १ पहा.**
२. व्यवसाय उद्योगानुसार समूह तयार करणे - व्यवसायांच्या प्रकारानुसार किंवा मिश्र व्यावसायिकांचा समूह.
३. तयारी तपासणी यादीच्या सर्व पायऱ्या पूर्ण करा.
४. सर्व सहभागींनी प्रवेश पत्रक पूर्णपणे भरले असल्याची खात्री करा. **परिशिष्ट २ पहा.**
५. कोर्सच्या सुरुवातीला सहभागी प्रशिक्षण पूर्व मूल्यमापनाचे वाटप करा. **परिशिष्ट ३ पहा.**
६. कोर्स संपल्यानंतर सहभागींना प्रशिक्षणोत्तर मूल्यमापनाचे वाटप करा. **परिशिष्ट ३ पहा.**
७. प्रेरक प्रशिक्षणोत्तर मूल्यमापन पूर्ण करा. **परिशिष्ट ३ पहा.**
८. श्रोत्यांच्या आवश्यकतेनुसार कृती आणि उदाहरणे यामध्ये सुधारणा करा.
९. समूह त्यांना दिलेला प्रत्येक अभ्यास नियोजित वेळेत पूर्ण करत असल्याची खात्री करा आणि तुमच्या धड्याच्या नियोजनाप्रमाणे पूर्ण करून घ्या. **परिशिष्ट ४ पहा.**

**अनुक्रमणिका**


सत्र १ : प्रस्तावना................................................ १

कृती १ अ : ओळख....... २

कृती १ ब : स्वयंमूल्यमापनाच्या अपेक्षा आणि लाभ....... ३

सत्र २ : पैसा म्हणजे काय?...................................... ५

कृती २ अ : आपण पैशाचा वापर कशासाठी करतो?...... ६

कृती २ ब : पैसा कोठून येतो?.............................. ९

सत्र ३ : तुमच्या कुटुंबाच्या उत्पन्नाची रचना आणि तुम्ही पैसा कसा खर्च करता? हे समजावून घेणे......................................... ११

कृती ३ अ : तुमच्या कुटुंबाच्या उत्पन्नाचा अंदाज घेणे...... १२

कृती ३ ब : तुमचे कुटुंब किती पैसा खर्च करते याचा अंदाज घेणे १९

कृती ३ क : इच्छांपासून गरजा वेगळ्या करणे.............. २८

सत्र ४ : तुमच्या पैशाचे व्यवस्थापन................................ २९

कृती ४ अ : उत्पन्न आणि खर्चाचे संतुलन.................. ३०

कृती ४ ब : बचत योजना तयार करणे....................... ३२

कृती ४ क : कुटुंबाचे अंदाजपत्रक तयार करणे.............. ३५

सत्र ५ : तुमच्या पैशाच्या सुरक्षेची रणनीति....................... ३९

कृती ५ अ : तुमच्या कुटुंबाला सुरक्षित पातळीवर आणणे.. ४०

कृती ५ ब : कोठे वाचवावेत?.............................. ४२

कृती ५ क : विमा काय आहे?............................. ४६

सत्र ६ : कृती नियोजन........................................... ५०

कृती ६ अ : कृती नियोजन................................. ५१

## सत्र १ : प्रस्तावना

या सत्रामध्ये सहभागींचा एकमेकांशी परिचय होईल आणि कृती आधारित शिक्षण पद्धतीची प्रस्तावना होईल.

| | |
|---|---|
| १.१ | **तुमची स्वत:ची ओळख करून देणे**<br>या कार्यक्रमाची रचना 'शिक्षकांशिवाय शिकविणे' आणि लोकांना<br>त्यांच्या आणि परस्परांच्या अनुभवातून शिकण्यासाठी परवानगी देण्यासाठी आहे, याचे स्पष्टीकरण द्या. हा सी–बीइडी कार्यक्रम पूर्ण केल्यानंतर सहभागींमध्ये कुटुंबाच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करण्याचे कौशल्य विकसित झालेले असेल. |
| १.२ | कार्यक्रमाचा सर्वसाधारण आराखडा द्या आणि या प्रशिक्षणामुळे आवश्यक ठरणाऱ्या अतिरिक्त सी–बीइडी अभ्यासक्रमाची चर्चा करा. |
| १.३ | **पहिल्या कार्याची/सत्राची प्रस्तावना करून देणे :**<br>यामध्ये सहभागींना एकमेकांची ओळख करून घेण्याची संधी आहे. सहभागींना कृती १ अ कडे वळण्यास सांगा आणि सहभागींमध्ये रंगीत पेन्सिल्स्/पेन आणि कागदांचे वितरण करा. |
| १.४ | **ध्येय :** सर्व सहभागींना एकमेकांविषयी आणि त्यांच्या सध्याच्या व्यवसायाबाबत जाणून घेता यावं.<br>१. सहभागींना त्यांच्या सध्याच्या व्यवसायाचे किंवा त्यांच्या नव्या व्यवसाय कल्पना यांचे चित्र काढण्यास सांगणे. (५ मिनिटे)<br>२. सहभागी एकेक करून गटाला आपला परिचय देतील, प्रत्येकजण त्याचे चित्र दाखवेल आणि त्यांच्या सध्याच्या व्यवसायाचे किंवा व्यवसाय कल्पनेचे स्पष्टीकरण देईल. (प्रत्येकी १ मिनिटे)<br>३. प्रत्येकजण त्याचे चित्र भिंतीवर लटकवेल. |

| सत्र १ : प्रस्तावना | |
|---|---|
| | **कृती १ अ : ओळख** |
| | १. प्रत्येकजण त्याच्या व्यवसायाचे किंवा नव्या व्यवसाय कल्पनेचे चित्र काढेल.<br>२. एका नंतर एक प्रत्येक व्यक्ती आपले नाव सांगेल, त्याच्या चित्राचे स्पष्टीकरण देईल आणि मागील सी-बीइडी प्रशिक्षणाचा कसा परिणाम झाला ते सांगेल. (१ मिनिट)<br>३. प्रत्येकजण त्याचे चित्र वर अडकवेल. |
| **१.५** | **सहभागींचे गट तयार करणे:**<br>लोक जर सध्या गटात नसतील, तर प्रेरकाने लोकांना एकाच व्यवसायाच्या प्रकारानुसार किंवा प्रेरकाला योग्य वाटेल, अशा पर्यायी गटामध्ये काम द्यावे. |
| **१.६** | सहभागींना कृती १ ब कडे वळण्यास सांगणे : |

## सत्र १ : प्रस्तावना

### कृती १ ब सूचना : स्वयं मूल्यमापनाच्या अपेक्षा आणि लाभ

| | |
|---|---|
| १.७ | सहभागींनी त्यांच्या कुटुंबासाठी त्यांची असणारी स्वप्ने किंवा आशा यांना साध्य करण्यासाठी त्यांना पैशाची बचत करणे गरजेचे आहे याचा विचार केला पाहिजे. उदाहरणार्थ, त्यांना कदाचित अंडी विक्रीसाठी कोंबड्या खरेदी करायच्या असतील, परंतु सध्या ते कोंबड्या खरेदी करू शकत नाहीत, किंवा त्यांना त्यांच्या मुलांना चांगल्या शाळेत पाठवायचे असेल परंतु त्यांना प्रवास खर्च परवडत नसेल.<br><br>सहभागींना या अभ्यासक्रमाच्या उर्वरित भागांमुळे इथपर्यंत पोहोचण्यासाठी किंवा अन्य, बचत लक्ष्ये आणि त्यांच्या कुटुंबाच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी मार्गदर्शन मिळवता येईल. |

**१. स्वयंमूल्यमापन पत्रक पूर्ण करणे.**
वैयक्तिक कार्यपत्रक पूर्ण करणे. (७ मिनिटे)

**२. गटाला प्रतिक्रिया सादर करणे.**
सहभागीने गटाला त्याची सर्वोच्च तीन स्वप्ने आणि अपेक्षा सादर कराव्यात. (१५ मिनिटे)

**३. चर्चा करणे.**
आजच्या अपेक्षांची सर्व सहभागींनी गटात चर्चा करणे. (१० मिनिटे)

**ध्येय :** माझ्या कुटुंबासाठी असणारी काही बचत लक्ष्ये आणि आजच्या अपेक्षा ओळखणे.

१. वैयक्तिक स्वयं मूल्यमापन कार्यपत्रक पूर्ण करणे. (७ मिनिटे)

२. प्रत्येक सहभागीने त्याची सर्वोच्च स्वप्ने आणि आव्हाने गटाला सादर करावीत. (१५ मिनिटे)

३. आजच्या अपेक्षांची सर्व सहभागींनी गटात चर्चा करणे. (१० मिनिटे)

## सत्र १ : प्रस्तावना

### कृती १ ब : स्वयं मूल्यमापनाच्या अपेक्षा आणि लाभ

**माझे हित :** भविष्यामध्ये माझ्या कुटुंबासाठी खालील स्वप्ने /बचत लक्ष्ये आहेत:

१. ______________________________

२. ______________________________

३. ______________________________

४. ______________________________

**माझा अनुभव :** माझी स्वप्ने पूर्ण करण्यासाठी मला खालील आव्हानांचा सामना करावा लागणार आहे:

१. ______________________________

२. ______________________________

३. ______________________________

४. ______________________________

**माझ्या अपेक्षा :** आजच्या प्रशिक्षण सत्रातून मला काय मिळण्याची अपेक्षा आहे:

१. ______________________________

२. ______________________________

३. ______________________________

४. ______________________________

| | |
|---|---|
| **सत्र २ : पैसा म्हणजे काय?** | |
| २.१ | **सत्र २ चा आढावा घेणे :**<br>आपणा सर्वांना आपल्या गरजा भागवण्यासाठी आणि आवश्यक वस्तू खरेदी करण्यासाठी पैशाची गरज आहे. आपल्याला वेगवेगळ्या स्रोताकडून म्हणजे काम करून, जमीन किंवा मालमत्ता मालकी व त्याचे भाडे, वस्तू विक्री आणि आपण समाजातील गट किंवा बँकेत ठेवलेल्या पैशावरील व्याज यामधून पैसा मिळत असतो.<br><br>वेगवेगळी कुटुंबे वेगवेगळ्या मार्गाने त्यांचा पैसा मिळवतात आणि त्याचा वापर वेगवेगळ्या कारणासाठी करतात. या सत्रामध्ये तुम्ही तुमचा पैसा कसा वापरता आणि तुमच्या कुटुंबाकडे असणाऱ्या पैशाचा स्रोत काय आहे? याबद्दल स्पष्टीकरण द्याल. |
| **कृती २ अ सूचना : आपण पैशाचा वापर कशासाठी करतो?** | |
| २.२ | **कृती २ अ ची प्रस्तावना करून देणे :**<br>या कृतीमध्ये तुम्ही पैशाचा वापर वेगवेगळ्या पद्धतीने कसा करावा हे पहाल. जसे तुमच्या घरामध्ये, तुमच्या कुटुंबासाठी, तुमच्या व्यवसायासाठी, समारंभासाठी आणि संकटकाळी.<br><br>पैशाचे अनेक उपयोग आहेत आणि तो तुमच्याकडे पुरेसा असेल तर तुमचा व्यवसाय वाढण्यासाठी मदत होईल आणि तुमच्या कुटुंबाचा जगण्याचा स्तर वाढेल. |
| २.३ | **ध्येय :** पैशाचे विविध उपयोग समजून घेणे आणि त्याचे वर्गीकरण करणे.<br>१. पैशाची संकल्पना समजून घेणे आणि कोणत्या कारणासाठी आपण पैसा वापरतो हे गटामध्ये ऐकणे. (२ मिनिटे)<br><br>२. पैशाद्वारे खरेदी करता येणाऱ्या वस्तूंच्या नावांची यादी सहभागी जोडीने वाचणे, अशा वस्तूंची वर्गवारी करणे, काही बाबी एकाहून अधिक वर्गात समाविष्ट होऊ शकतात, याची नोंद घ्या. (५ मिनिटे)<br><br>३. तुम्ही पैशाच्या वापराची यादी कशा प्रकारे केली आहे याची चर्चा तुमच्या गटात करणे. या यादीमध्ये नोंद नसलेल्या पैशाच्या वापराच्या अन्य उदाहरणांचा विचार करायचा प्रयत्न करणे. (१५ मिनिटे)<br><br>**सहभागींना कृती २ अ कडे वळण्यास सांगणे.** |

# सत्र २ : पैसा म्हणजे काय?

## कृती २ अ : आपण पैशाचा वापर कशासाठी करतो?

१. पैशाच्या संकल्पनेचा परिचय आणि पैशाच्या वापराची प्रेरकाने दिलेली यादी ऐकून घेणे. (२ मिनिटे)

२. खालील कोष्टक भरणे. सहभागी जोडीने पैशाद्वारे खरेदी करता येणाऱ्या वस्तूंच्या नावाची यादी निश्चित करणे. काही बाबी एकाहून अधिक वर्गात समाविष्ट होऊ शकतात. (५ मिनिटे)

गट चर्चा. तुम्ही यादी केलेल्या पैशाच्या वापराचे वर्गीकरण कशा पद्धतीने कराल? इथे यादीमध्ये तुमच्या समाजामधील उल्लेख न केलेला पैशाचा वापर आहे का? (१५ मिनिटे)

**प्रस्तावना : पैशाच्या वापराचे वर्ग**

| | |
|---|---|
| १. तुमच्या कुटुंबासाठी पैसा खर्च करणे. | २. तुमच्या घरासाठी पैसा खर्च करणे. |
| ३. तुमचा व्यवसाय किंवा नोकरीसाठी पैसा खर्च करणे. | ४. तुमच्या समाजासाठी पैसा खर्च करणे. |
| ५. संकट निवारणासाठी पैसा खर्च करणे. | ६. समारंभ आणि उत्सवासाठी पैसा खर्च करणे. |

# सत्र २ : पैसा म्हणजे काय?

## कृती २ अ : आपण पैशाचा वापर कशासाठी करतो?

**पैशाद्वारे खरेदी करता येऊ शकणाऱ्या वस्तूंच्या नावांची यादी**

धातूचे डबे/भांडी

शालेय फी

डिशेस

अंत्यसंस्कार

खाद्य

पूर

आग

दारू

जन्म समारंभ

औषधे

लग्न

वीज

प्रवास

अवजार

सुऱ्या

बेरोजगार होणे

आजारी मूल

भांडी

ट्रक खरेदी करणे

टेबल खरेदी करणे

पाणी व्यवस्था सुधारण्यासाठी देणगी देणे

देवळाला देणगी देणे

तंबाखू

| सत्र २ : पैसा म्हणजे काय? | |
|---|---|
| **कृती २ अ : आपण पैशाचा वापर कशासाठी करतो?** | |
| **प्रस्तावना : पैशाच्या वापराचे वर्ग** | |
| १. तुमच्या कुटुंबासाठी पैसा खर्च करणे. | २. तुमच्या घरासाठी पैसा खर्च करणे. |
| ३. तुमचा व्यवसाय किंवा नोकरीसाठी पैसा खर्च करणे. | ४. तुमच्या समाजासाठी पैसा खर्च करणे. |
| ५. संकट निवारण्यासाठी पैसा खर्च करणे. | ६. समारंभ आणि उत्सवासाठी पैसा खर्च करणे. |

## सत्र २ : पैसा म्हणजे काय?

### कृती २ ब सूचना : पैसा कोठून येतो?

| | |
|---|---|
| २.४ | **कृती २ ब ची प्रस्तावना करून देणे :**<br>लोकांना पैसा वेगवेगळ्या मार्गाने मिळतो. या वेगवेगळ्या शक्यतांमुळे तुमचे कुटुंब आणि व्यवसाय यांचे उत्पन्न वाढविण्याच्या नव्या शक्यता शोधण्याची संधी मिळते.<br><br>या कृतीमध्ये लोकांना वेगवेगळ्या प्रकारे पैसा कसा मिळतो? या विषयी तुम्ही विचार कराल आणि तुमच्यासाठी किंवा तुमच्या कुटुंबासाठी तुम्ही संधी ओळखू शकता का यावर चर्चा कराल. |
| २.५ | **ध्येय : पैसे मिळविण्याचे विविध मार्ग आणि नवीन संधी यांची ओळख होणे.**<br>१. प्रस्तावना आणि लक्ष्मीची कथा तुमच्या गटामध्ये वाचणे.(५ मिनिटे)<br>२. लक्ष्मी वेगवेगळ्या मार्गाने पैसे कसे मिळविते याची नोंद सहभागी जोडीमध्ये करणे. (५ मिनिटे)<br>३. सहभागी जोडीने तुमचे कुटुंब कोठे पैसे मिळवते याची यादी करणे. (५ मिनिटे)<br>४. पैसे मिळविण्याच्या वेगवेगळ्या मार्गांची तुमच्या गटामध्ये चर्चा करणे. (१० मिनिटे) |

१. प्रस्तावना आणि लक्ष्मीची कथा गटामध्ये वाचणे. (५ मिनिटे)

२. लक्ष्मी पैसे कसे मिळवते त्याची नोंद सहभागी जोडीने करणे. (५ मिनिटे)

३. तुम्हाला वेगवेगळ्या मार्गाने पैसे मिळतात ह्याची यादी सहभागी जोडीने करणे. (५ मिनिटे)

४. चर्चा करणे. तुमच्या प्रश्नाच्या उत्तराची गटामध्ये चर्चा करणे. पैसे मिळविण्याच्या कोणत्या नव्या संधी तुम्हाला आढळून आल्या? (१० मिनिटे)

# सत्र २ : पैसा म्हणजे काय?

## कृती २ ब सूचना : पैसा कोठून येतो?

| **लक्ष्मीची कथा** | लक्ष्मी तिचा नवरा आणि मुलांसमवेत रहात होती. लक्ष्मी दिवसातून तीन तास मोलकरीण म्हणून काम करते आणि त्या कामाबद्दल तिला पगार दिला जातो. लक्ष्मी दुपारी स्वत:चे घर स्वच्छ करते, मुलांची काळजी घेते आणि कुटुंबासाठी जेवण बनविते. तिच्या नवऱ्याचा रस्त्यावरील स्टॉलवर वड्याच्या विक्रीचा छोटासा व्यवसाय आहे.<br>त्यांच्या कुटुंबाच्या घराभोवती फळझाडे आहेत, तर काहीवेळा लक्ष्मीचा नवरा त्याच्या वड्याच्या स्टॉलवर फळे विकून जास्त पैसे मिळवितो. |
|---|---|

लक्ष्मीच्या कुटुंबाला त्यांचा पैसा कोठून मिळतो ?

| | |
|---|---|
| १. | मोलकरीण म्हणून लक्ष्मी काम करते. तिचे मालक तिला पैसे देतात. |
| २. | लक्ष्मीचा नवरा वडे विक्री करून पैसे मिळवितो. |
| ३. | लक्ष्मीचा नवरा फळे विकून पैसे मिळवितो. |

तुमच्या कुटुंबाचा पैसा कोठून येतो?

| | |
|---|---|
| १. | |
| २. | |
| ३. | |
| ४. | |

## सत्र ३ : तुमच्या कुटुंबाच्या उत्पन्नाची रचना आणि तुम्ही पैसा कसा खर्च करता? हे समजावून घेणे.

३.१ **सत्र ३ ची प्रस्तावना करून देणे :**

प्रस्तावनेमध्ये तुम्ही, तुमची आणि तुमच्या कुटुंबाची काही स्वप्ने आणि ही स्वप्ने वास्तवामध्ये आणताना तुम्हाला सामना करावा लागलेल्या आव्हानांची यादी दिलेली आहे.

पैशाची बचत आणि तुमच्या खर्चाच्या नियोजनामुळे तुमची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी तुम्हाला मदत मिळेल. परंतु यासाठी तुम्हाला तुमच्या कुटुंबाकडे येणाऱ्या पैशाचा नक्की स्रोत, तो बाहेर कसा जातो आणि त्यासाठी तुम्ही खर्च कसा करता? याची माहिती असली पाहिजे. तुमच्या आर्थिक स्थितीविषयी खरी माहिती मिळाल्यामुळे तुम्हाला उपलब्ध असणाऱ्या बचतीची आणि पैसे मिळविण्याची संधी याकडे तुम्ही स्पष्टपणे पाहू शकता.

या सत्रामध्ये तुमच्या कुटुंबाचे उत्पन्न कोठून येते, मासिक आणि वार्षिक पद्धतीने तुमच्याकडे किती उत्पन्न येते? यावर लक्ष दिले जाईल. त्यानंतर तुम्ही पैसा कसा खर्च करता? हे पाहिले जाईल.

- तुमचे उत्पन्न आणि खर्चाचा **शोध घेणे.**
- कोणते खर्च आवश्यक आहेत आणि कोणते नाहीत याचे **मूल्यमापन करणे.**
- तुमची आर्थिक स्थिती तुम्ही कशी सुधारु शकता हे **समजावून घेणे.**

## कृती ३ अ सूचना : तुमच्या कुटुंबाच्या उत्पन्नाचा अंदाज घेणे.

३.२ **कृती ३ अ ची प्रस्तावना करून घेणे : तुमच्या कुटुंबाच्या उत्पन्नाचा अंदाज घेणे.**

पैसे खर्च करण्याच्या चांगल्या पर्यायाची निवड करण्यासाठी, आपल्याकडे किती पैसा आहे, आपल्या कुटुंबाकडे केवढा आणि किती वेळा पैसा येतो? हे आपल्याला माहीत असणे आवश्यक आहे.

काही पैसे नियमितपणे, दररोज, आठवड्याने किंवा मासिक म्हणजे वेतन अशा प्रकारे येत असतात. अन्य वेळी पैसे हंगामानुसार किंवा अनियमितपणे येत असतात, म्हणजे आपण हंगामी फळांची विक्री करतो किंवा आपल्याला काही दिवस किंवा आठवड्यासाठी जास्तीचे काम मिळते.

या प्रकरणामध्ये, तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नाचा अंदाज घ्याल. उत्पन्न कोठून येते आणि किती वेळा येते याची यादी करणे.

**सहभागींना कृती ३ अ कडे वळण्यास सांगणे.**

**सत्र ३ : तुमच्या कुटुंबाच्या उत्पन्नाची रचना आणि तुम्ही पैसा कसा खर्च करता? हे समजावून घेणे.**

**कृती ३ अ सूचना : तुमच्या कुटुंबाच्या उत्पन्नाचा अंदाज घेणे.**

| | |
|---|---|
| **३.३** | **ध्येय :** तुमच्या कुटुंबाचे उत्पन्न किती आहे आणि ते केव्हा येते हे निर्धारित करणे.<br><br>१. लक्ष्मीने तिच्या कुटुंबाच्या मासिक आणि वार्षिक उत्पन्नाचा हिशोब केला. लक्ष्मीच्या कुटुंबाच्या उत्पन्नाचे पत्रक आणि हे पत्रक बनविण्यासाठी तिने उचललेल्या पावलांचे गटात वाचन करणे. (१० मिनिटे)<br><br>२. लक्ष्मीच्या कुटुंबाच्या उत्पन्नाच्या पत्रकाची चर्चा करणे आणि हिशोबाची पद्धत तुमच्या गटामध्ये प्रत्येकाला समजल्याची खात्री करणे. (१० मिनिटे)<br><br>३. तुमचे उत्पन्न पत्रक तयार करण्याच्या पावलावर काम करणे. तुम्हाला जर वेगवेगळ्या स्रोताकडून येणाऱ्या उत्पन्नाचे प्रत्यक्ष आकडे माहीत नसतील तर जास्तीत जास्त काटेकोर पद्धतीने (सहभागी जोडीने) अंदाज बांधणे. (१५ मिनिटे)<br><br>४. तुमच्या कुटुंबाच्या उत्पन्नाच्या तपशीलाची चर्चा करणे. उत्पन्नाचे प्रमुख स्रोत काय आहेत? ते कितपत नियमित आहेत? |

लक्ष्मीने तिच्या कुटुंबाच्या उत्पन्नाचे पत्रक आणि हिशोब करीत असताना कोणती पद्धत वापरली व कोणते पाऊल उचलले याचे गटामध्ये वाचन करणे. (१० मिनिटे)

१. लक्ष्मीच्या कुटुंबाच्या उत्पन्न पत्रकाची गटामध्ये चर्चा करणे. (१० मिनिटे)

२. तुमच्या स्वत:च्या कुटुंबाच्या उत्पन्नाचे पत्रक सहभागी जोडीने पूर्ण करणे. (१५ मिनिटे)

३. तुमच्या कुटुंबाच्या उत्पन्नाच्या पत्रकाच्या तपशीलाची गटाबरोबर चर्चा करणे. (१० मिनिटे)

## सत्र ३ : तुमच्या कुटुंबाच्या उत्पन्नाची रचना आणि तुम्ही पैसा कसा खर्च करता? हे समजावून घेणे.

### कृती ३ अ : तुमच्या कुटुंबाच्या उत्पन्नाचा अंदाज घेणे.

लक्ष्मीला माहीत आहे की, तिला मोलकरीण म्हणून मिळणारी मजुरी आणि तिच्या नवऱ्याच्या वडे विक्रीतून येणारे उत्पन्न हाच तिच्या कुटुंबाच्या उत्पन्नाचा प्रमुख स्रोत आहे. उत्पन्नाचे हे दोन्ही स्रोत नियमित आहेत.

लक्ष्मीला सामुदायिक बचत गटामध्ये तिने केलेल्या बचतीवर व्याज मिळते. ती एका वर्षामध्ये, रु. ३,००० बचत करते आणि रु. ३०० व्याज मिळते.

काही वेळेला लक्ष्मीचा नवरा त्यांच्या घराभोवती असलेल्या झाडांची फळे त्याच्या वड्याच्या स्टॉलवर विकतो.

### टप्पा १
### माझ्या उत्पन्नाचे स्रोत काय आहेत?

| तक्ता अ | उत्पन्नाचे स्रोत | साप्ताहिक मूल्य | मासिक मूल्य | प्रासंगिक (मूल्य प्रति वर्ष) |
|---|---|---|---|---|
| | लक्ष्मीची मोलकरीण म्हणून असणारी मजुरी | | ३,००० | |
| | लक्ष्मीच्या नवऱ्याची वडे विक्रीतून | २,००० | | |
| | लक्ष्मीच्या नवऱ्याची फळे विक्री | | | प्रति वर्ष २,००० |

**सत्र ३ : तुमच्या कुटुंबाच्या उत्पन्नाची रचना आणि तुम्ही पैसा कसा खर्च करता? हे समजावून घेणे.**

## कृती ३ अ : तुमच्या कुटुंबाच्या उत्पन्नाचा अंदाज घेणे.

### टप्पा २
### उत्पन्नाच्या प्रत्येक स्त्रोताकडून प्रत्येक महिन्याला मला किती पैसा मिळतो?

**लक्ष्मीला तिच्या महिन्याच्या उत्पन्नाचा हिशोब करताना तिचे आठवड्याचे उत्पन्न किती आहे आणि प्रत्येक महिन्याला त्यामध्ये ती किती भर घालू शकते याचा हिशोब करणे आवश्यक आहे.**

**१. प्रत्येक आठवड्याच्या उत्पन्नाचा स्रोत प्रत्येक महिन्यामध्ये कितपत भर घालू शकतो याचा हिशोब करणे.**
ती यासाठी, प्रत्येक आठवड्यामध्ये स्रोताला ४ ने गुणते.

| तक्ता ब | आठवड्याच्या उत्पन्नाचे स्रोत | प्रत्येक आठवड्याच्या उत्पन्नाचे मूल्य | आकडेवारी (साप्ताहिक मूल्य x ४) | एकूण मासिक |
|---|---|---|---|---|
| | लक्ष्मीच्या नवऱ्याची वडे विक्री | २,००० | २,००० x ४ | ८,००० |

**२. उत्पन्नाच्या प्रासंगिक स्रोतापासून प्रत्येक महिन्याला ती कितपत पैसा मिळवू शकते याचा अंदाज घेणे.**
लक्ष्मीने प्रत्येक वर्षाला प्रासंगिक उत्पन्नाच्या स्रोताकडून तिला मिळणाऱ्या पैशाचा हिशोब केला आहे. प्रत्येक महिन्याला मिळणाऱ्या पैशाचा हिशोब करण्यासाठी, ती १२ ने भागते.

| तक्ता ब | प्रासंगिक उत्पन्न स्रोत | प्रत्येक वर्षाच्या उत्पन्नाचे मूल्य | आकडेवारी (वार्षिक मूल्य ÷ १२) | एकूण मासिक |
|---|---|---|---|---|
| | लक्ष्मीच्या नवऱ्याची फळ विक्री | २,००० | २,००० ÷ १२ | १६७ |

**सत्र ३ : तुमच्या कुटुंबाच्या उत्पन्नाची रचना आणि तुम्ही पैसा कसा खर्च करता? हे समजावून घेणे.**

## कृती ३ अ : तुमच्या कुटुंबाच्या उत्पन्नाचा अंदाज घेणे.

### टप्पा ३
### माझे एकूण मासिक उत्पन्न काय आहे?

लक्ष्मीने तिचे एकूण मासिक आणि वार्षिक उत्पन्न शोधून काढण्यासाठी तिच्या मासिक उत्पन्नाचे स्रोत तक्ता अ, ब आणि क मध्ये लिहिले आहेत.

लक्ष्मीच्या कुटुंबाच्या उत्पन्नाचे पत्रक

| | **मासिक उत्पन्नाचा स्रोत** | **मासिक उत्पन्न** | **वार्षिक उत्पन्न (मासिक उत्पन्न x १२)** |
|---|---|---|---|
| तक्ता अ | लक्ष्मीची मोलकरीण म्हणून असणारी मजुरी | ३,००० | ३६,००० |
| तक्ता ब | लक्ष्मीच्या नवऱ्याची वड्याची विक्री | ८,००० | ९६,००० |
| तक्ता क | लक्ष्मीच्या नवऱ्याची फळ विक्री | १६७ | २,००० |
| | **एकूण उत्पन्न**<br>साप्ताहिक, मासिक आणि प्रासंगिक उत्पन्नाची बेरीज मिळवा. | **११,१६७** | **१,३४,०००** |

**सत्र ३ : तुमच्या कुटुंबाच्या उत्पन्नाची रचना आणि तुम्ही पैसा कसा खर्च करता? हे समजावून घेणे.**

**कृती ३ अ : तुमच्या कुटुंबाच्या उत्पन्नाचा अंदाज घेणे.**

**टप्पा १**

**माझ्या उत्पन्नाचे स्रोत काय आहेत?**

तुम्ही मिळवत असलेल्या साप्ताहिक, मासिक आणि प्रासंगिक स्रोतांचे उत्पन्न ओळखणे

| | उत्पन्नाचा स्रोत | साप्ताहिक मूल्य | मासिक मूल्य | प्रासंगिक मूल्य प्रति वर्षी |
|---|---|---|---|---|
| तक्ता ३ | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

**सत्र ३ : तुमच्या कुटुंबाच्या उत्पन्नाची रचना आणि तुम्ही पैसा कसा खर्च करता? हे समजावून घेणे.**

**कृती ३ अ : तुमच्या कुटुंबाच्या उत्पन्नाचा अंदाज घेणे.**

**टप्पा २**

**प्रत्येक उत्पन्नाच्या स्रोतापासून मी किती पैसे मिळवतो?**

**१. कोणत्या आठवड्याचे उत्पन्न स्रोत उत्पन्नात भर घालते याचा हिशोब करा.**

| तक्ता ब | साप्ताहिक उत्पन्न स्रोत | प्रत्येक आठवड्याच्या उत्पन्नाचे मूल्य | आकडेवारी (साप्ताहिक मूल्य x ४) | मासिक बेरीज |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

**२. प्रासंगिक उत्पन्न स्रोतापासून तुम्ही किती पैसा मिळवू शकता याचा अंदाज घेणे.**

| तक्ता क | प्रासंगिक उत्पन्न स्रोत | वार्षिक उत्पन्न मूल्य | आकडेवारी (वार्षिक मूल्य ÷ १२) | मासिक बेरीज |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

**सत्र ३ : तुमच्या कुटुंबाच्या उत्पन्नाची रचना आणि तुम्ही पैसा कसा खर्च करता? हे समजावून घेणे.**

## कृती ३ अ : तुमच्या कुटुंबाच्या उत्पन्नाचा अंदाज घेणे.

### टप्पा ३
### माझे एकूण मासिक उत्पन्न काय आहे?

तक्ता अ, ब आणि क यातील मासिक उत्पन्न स्रोताची बेरीज करून तुमचे एकूण मासिक उत्पन्न काढणे.

**तुमच्या कुटुंबाच्या उत्पन्नाचे पत्रक**

| | मासिक उत्पन्न स्रोत | मासिक उत्पन्न | वार्षिक उत्पन्न |
|---|---|---|---|
| तक्ता अ | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| तक्ता ब | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| तक्ता क | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| **एकूण उत्पन्न**<br>साप्ताहिक, मासिक आणि प्रासंगिक उत्पन्नाची एकूण बेरीज करा. | | | |

**सत्र ३ : तुमच्या कुटुंबाच्या उत्पन्नाची रचना आणि तुम्ही पैसा कसा खर्च करता? हे समजावून घेणे.**

**कृती ३ ब सूचना : तुमचे कुटुंब किती पैसे खर्च करते याचा अंदाज घेणे.**

**३.४** कृती ३ ब ची प्रस्तावना करून देणे : तुमचे कुटुंब किती पैसा खर्च करते याचा अंदाज घेणे.
तुम्ही आणि तुमच्या कुटुंबाचे सदस्य पैसा कसा खर्च करता, याचा शोध घेणे हे अनेक कारणासाठी उपयुक्त आहे :

- कर्ज बाजारी होण्याचे टाळणे.
- पैशाच्या बचतीला मदत करणे.
- कोणते आवश्यक खर्च कमी करता येतील ते पाहणे.
- जास्त सूज्ञपणे पैसा खर्च करणे आणि बचत करण्याची संधी पहाणे.

या प्रकरणामध्ये, तुम्ही तुमचे पत्रक बनविण्यापूर्वी लक्ष्मीच्या कुटुंबाच्या खर्चाचे पत्रक तुम्हाला पहायला मिळेल. तुमच्या मासिक खर्चाचे पत्रक तयार करतांना तुम्हाला कृती ३ अ सारखे टप्पे वापरावे लागतील.

**३.५** **ध्येय :** तुमचे कुटुंब पैसे कसे खर्च करते, तुम्ही किती खर्च करता आणि तुम्ही कोठे खर्च करता हे स्पष्टपणे पहाणे.

१. लक्ष्मीच्या कुटुंबाच्या खर्चाचे पत्रक गटात वाचणे आणि तिच्या खर्चाच्या पत्रकाची आकडेवारी करतांना तिने उचललेल्या पावलांची चर्चा करणे. (१० मिनिटे)
२. टप्पा १ पूर्ण करणे : माझे कुटुंब कशावर खर्च करीत आहे? याची दोघांत चर्चा करणे. (५ मिनिटे)
३. टप्पा २ पूर्ण करणे : माझे कुटुंब प्रत्येक आठवड्याला आणि प्रासंगिक खरेदीवर किती खर्च करते? याची दोघांत चर्चा करणे. (१० मिनिटे)
४. टप्पा ३ पूर्ण करणे आणि तुमच्या कुटुंबाचे मासिक आणि वार्षिक खर्चाचे पत्रक हे दोघांनी भरणे. (१५ मिनिटे)
५. तुम्ही विकसित केलेल्या पत्रकावर तुमच्या समूहामध्ये चर्चा करणे. आकडेमोड कशी करायची हे प्रत्येकाला स्पष्टपणे समजले आहे काय? (१० मिनिटे)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. लक्ष्मीच्या कुटुंबाच्या खर्चाचे पत्रक तयार करताना तिने उचललेली पावले गटामध्ये वाचणे. (१० मिनिटे) | २. सहभागी जोडीने टप्पा १ पूर्ण करणे : माझे कुटुंब कशावर खर्च करीत आहे? (५ मिनिटे) | ३. सहभागी जोडीने टप्पा २ पूर्ण करणे : माझे कुटुंब प्रत्येक आठवड्याला आणि प्रासंगिक खरेदीवर किती खर्च करते? (१० मिनिटे) | ४. सहभागी जोडीने, तुमच्या कुटुंबाच्या संपूर्ण खर्चाचे पत्रक तयार करण्यासाठी टप्पा ३ पूर्ण करणे. (१५ मिनिटे) | ५. तुमच्या खर्चाच्या पत्रकाची समूहामध्ये चर्चा करणे. ते तुमच्या अपेक्षेप्रमाणे आहे काय? (१० मिनिटे) |

## सत्र ३ : तुमच्या कुटुंबाच्या उत्पन्नाची रचना आणि तुम्ही पैसा कसा खर्च करता? हे समजावून घेणे.

### कृती ३ ब : तुमचे कुटुंब किती पैसे खर्च करते याचा अंदाज घेणे.

लक्ष्मीच्या कुटुंबाला करावे लागणारे खर्च अनेक प्रकारचे आहेत. या आवश्यक खर्चांमध्ये खालील खर्च समाविष्ट आहेत :

- कौटुंबिक खर्च उदा. अन्न, कपडे, मुलांच्या शिक्षणाचा खर्च
- घरगुती खर्च : त्यांच्या घराचे भाडे, त्यांच्या घरासाठी गॅस, वीज आणि पाणी बील
- परिवहन उदा. मुलांना शाळेत आणि लक्ष्मीला कामाला जाण्यासाठी बस भाडे, कुटुंबाच्या बाईकसाठी पेट्रोल
- तिच्या नवऱ्याच्या व्यवसायासाठी पैसा उदा. वडे तयार करण्यासाठी वस्तूंची खरेदी

प्रत्येकाप्रमाणे, काही वेळा कुटुंबाला **प्रासंगिक खर्च** करावे लागतात, उदाहरणार्थ, मित्राला त्याच्या लग्न समारंभासाठी पैसे देणे किंवा मूल आजारी असताना डॉक्टरांची फी देणे. यातील काही आवश्यक आहेत.

जगण्यासाठी **आवश्यक** नसताना देखील **पाहिजे** म्हणून आणि मजा म्हणून कुटुंब अनावश्यक वस्तूवर खर्च करीत असते, जसे लक्ष्मीच्या नवऱ्याच्या तंबाखू किंवा मुलांसाठी गोळ्या, बिस्किटे.

लक्ष्मीने कुटुंबाच्या मासिक व वार्षिक खर्चाचे पत्रक ज्या तीन टप्प्यात तयार केले तेच तीन टप्पे उत्पन्नाचे पत्रक तयार करताना वापरले.

**सत्र ३ : तुमच्या कुटुंबाच्या उत्पन्नाची रचना आणि तुम्ही पैसा कसा खर्च करता? हे समजावून घेणे.**

**कृती ३ ब : तुमचे कुटुंब किती पैसे खर्च करते याचा अंदाज घेणे.**

**टप्पा १**

**माझे कुटुंब कशावर खर्च करीत आहे?**

लक्ष्मीने तिचे कुटुंब साप्ताहिक, मासिक आणि प्रासंगिक उत्पन्नाचा पैसा कसा खर्च करते हे ओळखले आहे. लक्ष्मीला वाटते की गेल्या वर्षी तिच्या कुटुंबाने केलेला खर्च प्रतिनिधिक स्वरूपाचा होता. म्हणून तिने प्रासंगिक खर्चासाठी जसे, आकस्मिक किंवा सामुदायिक खर्च यासाठी मागील वर्षाची उदाहरणे घेतली आहेत.

**तक्ता ळ**

| **खर्चाचा प्रकार** | **साप्ताहिक** | **मासिक** | **प्रासंगिक** |
|---|---|---|---|
| **१. कौटुंबिक खर्च** | | | |
| अन्न | ५०० | | |
| कपडे | | | ८०० |
| बूट | | | ५०० |
| फोन | | २०० | |
| मुलांच्या शाळेच्या बसचे भाडे | १०० | | |
| शाळेचा गणवेष | | | ५०० |
| शालेय पुस्तके व पेन | | ५०० | |
| मुलांसाठी गोळ्या, बिस्किटे | | २०० | |
| खेळणी | | | ५०० |
| नवऱ्याची तंबाखू | ५० | | |
| दारु | | २०० | |
| **२. घरगुती** | | | |
| वीज बील | | ३०० | |
| गॅस | | | १,००० |
| पाणी बील | | ५० | |
| घर दुरुस्ती | | | ४०० |
| भाडे | | ३,००० | |
| स्वच्छता उत्पादने | | | २०० |
| **३. व्यवसाय किंवा नोकरी खर्च** | | | |
| लक्ष्मीचे कामाला जातानाचे बस भाडे | १०० | | |
| नवऱ्याचा व्यवसाय : वडे शिजविण्यासाठी गॅस | | | १,००० |
| वड्याला लागणाऱ्या वस्तू | | ६०० | |
| स्वयंपाक उपकरण (पॅन, चमचे इ.) | | | ४०० |
| वडे देण्यासाठी प्लेट आणि बॅग | | २०० | |
| स्टॉलपर्यंत जाण्यासाठी बाईकला पेट्रोल | १५० | | |
| **४. सामुदायिक खर्च** | | | |
| मंदिर देणगी | | | ५०० |
| **५. समारंभ व उत्सवासाठी खर्च** | | | |
| जन्म किंवा लग्नासाठी आहेर | | | २०० |
| **६. आकस्मिक खर्च** | | | |
| औषधे | | | ५०० |
| आजारी मुलासाठी डॉक्टर फी | | | ५०० |
| बाईक दुरुस्ती | | | १,००० |

**सत्र ३ : तुमच्या कुटुंबाच्या उत्पन्नाची रचना आणि तुम्ही पैसा कसा खर्च करता? हे समजावून घेणे.**

**कृती ३ ब : तुमचे कुटुंब किती पैसे खर्च करते याचा अंदाज घेणे.**

**टप्पा २**

**माझे कुटुंब प्रत्येक महिन्याला साप्ताहिक आणि प्रासंगिक खरेदीसाठी किती पैसा खर्च करते?**

**१. प्रत्येक महिन्याला प्रासंगिक खर्चासाठी तुम्ही किती खर्च करता याचा हिशोब करा.**

येथे लक्ष्मीच्या आकडेवारीचा निवडक तपशील दिलेला आहे. तिने आपले निष्कर्ष खर्चाच्या पत्रकामध्ये दिलेले आहेत.

| तक्ता ब | **साप्ताहिक खर्च** | **साप्ताहिक खर्चाचे मूल्य** | **आकडेवारी साप्ताहिक मूल्य x ४** | **मासिक बेरीज** |
|---|---|---|---|---|
| | अन्न | ५०० | ५०० x ४ | २,००० |
| | नवऱ्याची तंबाखू | ५० | ५० x ४ | २०० |
| | स्टॉल वाहून नेण्यासाठी बाईकला पेट्रोल | १५० | १५० x ४ | ६०० |

**२. तुम्ही प्रत्येक महिन्याला किती पैसा आकस्मिक खर्चासाठी खर्च करता.**

लक्ष्मीला वाटते की ती सर्व प्रासंगिक खर्चाच्या वस्तू वर्षातून सुमारे तीन वेळा आणते. येथे लक्ष्मीने आकडेवारीचा तपशील दिला आहे, ज्याचा वापर तिने खर्चाचे पत्रक भरण्यासाठी केलेला आहे.

| तक्ता क | **प्रासंगिक खर्च** | **खर्च केलेल्या वेळेची संख्या** | **प्रत्येक वेळी खर्च केलेली किंमत** | **वार्षिक किंमत (खर्च केलेल्या वेळेची संख्या x प्रत्येक वेळी खर्च केलेली किंमत)** | **मासिक किंमत (वार्षिक किंमत ÷ १२)** |
|---|---|---|---|---|---|
| | कपडे | ३ | ८०० | २,४०० | २०० |
| | स्वच्छता उत्पादने | ३ | २०० | ६०० | ५० |
| | नवऱ्याचा व्यवसाय : | | | | |
| | वडे शिजविण्यासाठी गॅस | ३ | १,००० | ३,००० | २५० |
| | जन्म किंवा लग्नासाठी | | | | |
| | आहेर | ३ | २०० | ६०० | ५० |
| | बाईक दुरुस्ती | ३ | १,००० | ३,००० | २५० |

**सत्र ३ : तुमच्या कुटुंबाच्या उत्पन्नाची रचना आणि तुम्ही पैसा कसा खर्च करता? हे समजावून घेणे.**

**कृती ३ ब : तुमचे कुटुंब किती पैसे खर्च करते याचा अंदाज घेणे.**

**टप्पा ३**

**माझा मासिक आणि वार्षिक खर्च काय आहे?**

**लक्ष्मीने तिच्या मासिक खर्चाचा तपशील तक्ता अ मध्ये दिलेला आहे आणि कुटुंबाच्या मासिक आणि वार्षिक खर्चाचे पत्रक बनविताना तिने केलेली आकडेवारी साप्ताहिक (तक्ता ब) आणि प्रासंगिक खर्च (तक्ता क) मध्ये दिलेले आहेत.**

**लक्ष्मीच्या कुटुंबाच्या खर्चाचे पत्रक**

| मासिक खर्चाचा स्रोत | गरज किंवा इच्छा | मासिक खर्च | वार्षिक खर्च (मासिक खर्च X १२) |
|---|---|---|---|
| **१. कौटुंबिक खर्च** | | | |
| अन्न | गरज | २,००० | २४,००० |
| कपडे | गरज | २०० | २,४०० |
| बूट | गरज | १२५ | १,५०० |
| फोन | इच्छा | २०० | २,४०० |
| मुलांना शाळेत जाण्यासाठी बसचे भाडे | गरज | ४०० | ४,८०० |
| शाळेचा गणवेष | गरज | १२५ | १,५०० |
| शालेय पुस्तके व पेन | गरज | १२५ | १,५०० |
| मुलांसाठी गोळया, बिस्किटे | इच्छा | २०० | २,४०० |
| खेळणी | इच्छा | १२५ | १,५०० |
| नवऱ्याची तंबाखू | इच्छा | २०० | २,४०० |
| दारु | इच्छा | २०० | २,४०० |
| **२. घरगुती** | | | |
| वीज बील | गरज | ३०० | ३,६०० |
| गॅस | गरज | २५० | ३,००० |
| पाणी बील | गरज | ५० | ६०० |
| घर दुरुस्ती | गरज | १०० | १,२०० |
| भाडे | गरज | ३,००० | ३६,००० |
| स्वच्छता उत्पादने | गरज | ५० | ६०० |
| **३. व्यवसाय किंवा नोकरी खर्च** | | | |
| लक्ष्मीचे कामाला जातानाचे बस भाडे | गरज | ४०० | ४,८०० |
| नवऱ्याचा व्यवसाय : वडे तळण्यासाठी गॅस | गरज | २५० | ३,००० |
| वड्यांसाठी लागणाऱ्या वस्तू | गरज | ६०० | ७,२०० |
| स्वयंपाकाची भांडी | गरज | १०० | १,२०० |
| वडे देण्यासाठी प्लेट आणि चमचे | गरज | २०० | २,४०० |
| स्टॉल नेण्यासाठी बाईकला पेट्रोल | गरज | ६०० | ७,२०० |
| **४. सामुदायिक खर्च** | | | |
| मंदिर देणगी | गरज | १२५ | १,५०० |
| **५. समारंभ व उत्सवासाठी खर्च** | | | |
| जन्म किंवा लग्नासाठी आहेर | इच्छा | ५० | ६०० |
| **६. आकस्मिक खर्च** | | | |
| औषधे | गरज | १२५ | १,५०० |
| आजारी मुलांसाठी डॉक्टर फी | गरज | १२५ | १,५०० |
| बाईक दुरुस्ती | गरज | २५० | ३,००० |
| **एकूण खर्च** | | | |
| मासिक आणि वार्षिक खर्चाची बेरीज | | **१०,४७५** | **१२५,७००** |

## सत्र ३ : तुमच्या कुटुंबाचे उत्पन्न आणि तुम्ही पैसा कसा खर्च करता हे समजावून घेणे

### कृती ३ ब : तुमचे कुटुंब किती पैसे खर्च करते याचा अंदाज घेणे.

### टप्पा १

### माझे कुटुंब कशावर पैसा खर्च करीत आहे?

तुमचे कुटुंब साप्ताहिक, मासिक आणि प्रासंगिक किती पैसा खर्च करते ते ओळखा.

तक्ता ७

| खर्चाचा प्रकार | साप्ताहिक | मासिक | प्रासंगिक |
|---|---|---|---|
| १. कुटुंब | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| २. घरगुती | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| ३. व्यवसाय किंवा नोकरीसाठी खर्च | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| ४. सामुदायिक खर्च | | | |
| | | | |
| | | | |
| ५. समारंभ आणि उत्सवासाठी खर्च | | | |
| | | | |
| | | | |
| ६. आकस्मिक खर्च | | | |
| | | | |

**सत्र ३ : तुमच्या कुटुंबाच्या उत्पन्नाची रचना आणि तुम्ही पैसा कसा खर्च करता? हे समजावून घेणे.**

**कृती ३ ब : तुमचे कुटुंब किती पैसे खर्च करते याचा अंदाज घेणे.**

**टप्पा २**

**माझे कुटुंब प्रत्येक महिन्याला साप्ताहिक आणि प्रासंगिक खरेदीसाठी किती पैसा खर्च करते?**

**१. प्रत्येक महिन्याला साप्ताहिक खरेदीसाठी तुम्ही खर्च करीत असलेल्या पैशाचा हिशोब करा.**

| तक्ता ब | साप्ताहिक खर्च | साप्ताहिक खर्चाचे मूल्य | आकडेवारी (साप्ताहीक मूल्य x ४) | मासिक बेरीज |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

**सत्र ३ : तुमच्या कुटुंबाच्या उत्पन्नाची रचना आणि तुम्ही पैसा कसा खर्च करता? हे समजावून घेणे.**

**कृती ३ ब : तुमचे कुटुंब किती पैसे खर्च करते याचा अंदाज घेणे.**

**२. प्रत्येक महिन्याला प्रासंगिक खर्चासाठी तुम्ही किती खर्च करता याचा अंदाज घेणे.**

| | प्रासंगिक खर्च | खर्च केलेल्या वेळेची संख्या | प्रत्येक वेळी खर्च केलेली किंमत | वार्षिक किंमत (खर्च केलेल्या वेळेची संख्या x प्रत्येक वेळी खर्च केलेली किंमत) | मासिक किंमत (वार्षिक किंमत ÷ १२) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| तक्ता क | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

## सत्र ३ : तुमच्या कुटुंबाचे उत्पन्न आणि तुम्ही पैसा कसा खर्च करता हे समजावून घेणे

### कृती ३ ब : तुमचे कुटुंब किती पैसे खर्च करते याचा अंदाज घेणे.

### टप्पा ३ : माझा मासिक आणि वार्षिक खर्च काय आहे?

मासिक खर्चाचा तपशील तक्ता अ आणि कुटुंबाच्या मासिक आणि वार्षिक खर्चाचे पत्रक बनविताना तिने साप्ताहिक (तक्ता ब) आणि प्रासंगिक खर्च (तक्ता क) मधून घ्यावेत.

**तुमच्या कुटुंबाच्या खर्चाचे पत्रक**

| **मासिक खर्चाचा स्रोत** | | **मासिक खर्च** | **वार्षिक खर्च (मासिक खर्च x १२)** |
|---|---|---|---|
| **१. कौटुंबिक खर्च** | **गरज किंवा इच्छा** | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| **२. घरगुती खर्च** | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| **३. व्यवसाय किंवा नोकरीसाठी खर्च** | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| **४. सामुदायिक खर्च** | | | |
| | | | |
| | | | |
| **५. समारंभ आणि उत्सवासाठी खर्च** | | | |
| | | | |
| | | | |
| **६. तातडीचे खर्च** | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| **एकूण खर्च** | | | |
| **मासिक आणि वार्षिक खर्चाची बेरीज** | | | |

| सत्र ३ : तुमच्या कुटुंबाचे उत्पन्न आणि तुम्ही पैसा कसा खर्च करता हे समजावून घेणे | |
|---|---|
| **कृती ३ क सूचना : इच्छांपासून गरजा वेगळ्या करणे** | |
| ४.२ | **कृती ३ क ची प्रस्तावना करून देणे : गरजा आणि इच्छा वेगळ्या करणे.**<br>आपणा सर्वांना जगण्यासाठी काही वस्तूंची गरज असते. यामध्ये अन्न, घर आणि काम यांचा समावेश आहे. काम केल्याशिवाय अन्न घेण्यासाठी किंवा भाडे भरण्यासाठीचा पैसा आपण मिळवू शकत नाही, परंतु आपल्याला काम करण्यासाठी देखील पैशाची गरज असते. ही कदाचित नोकरीवर जाण्यासाठी किंवा आपला व्यवसाय चालू ठेवण्यासाठी असू शकते.<br><br>काही वस्तू आपल्याला हव्या असतात ज्यामुळे आपल्या आयुष्याच्या दर्जामध्ये वाढ होते; त्या खरेदी करण्यासाठी आपण पैसा वापरतो, परंतु त्याशिवाय आपण जगू शकतो. |
| ४.३ | **ध्येयः** आपल्या गरजा भागविणाऱ्या आणि इच्छा पूर्ण करणाऱ्या क्षेत्राची ओळख होणे. आपल्याकडे बचतीसाठी असणारी किंवा उत्पादक खर्चाच्या क्षेत्रासाठी काही आर्थिक मोकळीक शोधणे.<br><br>१. पुन्हा लक्ष्मीचे कौटुंबिक खर्चाचे पत्रक पहा (कृती ३ ब, पाऊल ३). लक्ष्मीचे कुटुंब खर्च करत असलेल्या गरजा किंवा इच्छा तिने ओळखल्या. तिची यादी वाचा. तिचे वर्गीकरण गटामध्ये तुम्हाला मान्य आहे का? (५ मिनिटे)<br><br>२. तुमच्या स्वतःच्या कौटुंबिक खर्चाचे पत्रक पाहणे (कृती ३ ब, पाऊल ३). खर्चाच्या कोणत्या वस्तू गरजेच्या आहेत आणि कोणत्या हव्या आहेत हे सहभागीने जोडीने निश्चित करणे. (५ मिनिटे)<br><br>३. तुमच्या वर्गीकरणाची तुमच्या गटामध्ये चर्चा करणे. तुम्ही गरजेच्या किंवा इच्छेच्या वस्तूंवर जास्त खर्च करता का? लोकांच्या सगळयात जास्त ''इच्छा'' काय आहेत? तुमच्या खर्चावर फेरविचार करण्यास जागा आहे असे तुम्हाला वाटते का? (१० मिनिटे) |
| **कृती ३ क सूचना : इच्छेपासून गरजा वेगळ्या करणे** | |
| | **१. लक्ष्मीच्या गरजा आणि इच्छा यांच्या वर्गीकरणाचा आढावा घेणे.**<br>लक्ष्मीने तिच्या कौटुंबिक खर्चाच्या पत्रकामध्ये, कोणत्या गरजा आहेत आणि कोणत्या इच्छा आहेत अशा वस्तूंची नोंद केली आहे. तिच्या वर्गीकरणाचे गटामध्ये वाचन करणे. (८ मिनिटे)<br><br>**२. तुम्ही खर्च करत असलेल्या वस्तूपैकी कोणत्या गरजेच्या आणि कोणत्या इच्छेच्या आहेत हे निश्चित करणे.**<br>तुमच्या खर्चाच्या पत्रकातील चौकटी सहभागी जोडीने पूर्ण भरणे. (कृती ३ ब, टप्पा ३) (५ मिनिटे)<br><br>**३. चर्चा करणे.**<br>तुमच्या वर्गीकरणाची गटामध्ये चर्चा करणे. तुम्ही तुमचा खर्च बदलू शकता का? बदल करण्यास वाव आहे असे वाटते का? (१० मिनिटे). |

## सत्र ४ : तुमच्या पैशाचे व्यवस्थापन

**४.१ सत्र ४ ची प्रस्तावना करून देणे :**

या सत्रामध्ये तुम्हाला तुमच्या पैशाचे नियमन करण्यासाठी काही मूलभूत बाबींची कल्पना दिली जाईल. आता तुम्हाला उत्पन्न किती आहे याची कल्पना आहे आणि तुमच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी तुम्ही किती खर्च करता यावर तुम्ही काम करू शकता.

तुम्ही जर आधी बचत करीत असाल तर, तुम्ही प्रथम तुमचे उत्पन्न आणि खर्चाच्या बाकीचा हिशोब करायला शिकाल. त्यानंतर तुम्हाला तुमच्या कुटुंबाचे आर्थिक ध्येय किंवा स्वप्ने ओळखावी लागतील आणि ती साध्य करण्यासाठी बचतीची योजना करावी लागेल. शेवटी तुमच्या कुटुंबाचे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी या कौशल्याचा तुम्ही एकत्रित वापर कराल.

## कृती ४ अ सूचना : उत्पन्न आणि खर्च यांचे संतुलन

४.२ **कृती ४ अ ची प्रस्तावना करून देणे :**

सत्र ३ मध्ये तुम्ही लक्ष्मीच्या कौटुंबिक उत्पन्न आणि खर्चाची आकडेवारी पाहिली. त्यानंतर तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या उत्पन्न आणि खर्चाची आकडेवारी केली. कृती ५ अ मध्ये तुम्ही तुमच्या उत्पन्न आणि खर्चाचे संतुलन आहे का याची तपासणी कराल. दुसऱ्या शब्दामध्ये, तुम्ही तुमच्या उत्पन्नापेक्षा जास्त किंवा कमी खर्च करता का हे पहाल.

**४.३** **ध्येय :** तुमचे उत्पन्न आणि खर्च यामध्ये संतुलन आहे का हे पहाणे.

१. उत्पन्न आणि खर्च यांच्या संतुलनाच्या आकडेवारीचे आणि लक्ष्मीच्या आकडेवारीचा गटामध्ये आढावा घेणे. (१० मिनिटे)

२. तुमच्या कुटुंबाच्या उत्पन्नाच्या शिलकीचे पत्रक सहभागी जोडीने पूर्ण करणे. तुम्ही कृती ३ अ आणि ३ ब मध्ये केलेल्या तुमच्या मासिक आणि वार्षिक उत्पन्न आणि खर्चाच्या आकडेवारीचा उपयोग करणे. (१५ मिनिटे)

३. तुमच्या निष्कर्षाची गटामध्ये चर्चा करणे. (१० मिनिटे)

**१. लक्ष्मीच्या आकडेवारीचा आढावा घेणे.** लक्ष्मीचे उत्पन्न आणि खर्च यांच्या संतुलनाची आकडेवारी गटामध्ये वाचणे. (१० मिनिटे)

**२. तुमच्या कुटुंबाचे उत्पन्न आणि खर्च पत्रक पूर्ण करणे.** तुमच्या उत्पन्न आणि खर्च यांच्या संतुलनासाठी सहभागी जोडीने तुमच्या कृती ३ अ आणि ३ ब च्या निष्कर्षाचा वापर करणे. (१५ मिनिटे)

**३. चर्चा करणे.** तुमच्या निष्कर्षाची गटामध्ये चर्चा करणे. तुमचे कुटुंब तुमच्या उत्पन्नापेक्षा जास्त किंवा कमी खर्च करते का? (१० मिनिटे)

## सत्र ४ : तुमच्या पैशाचे व्यवस्थापन

## कृती ४ अ : उत्पन्न आणि खर्चाचे संतुलन

### तुमचे उत्पन्न, खर्च आणि शिलकीची आकडेवारी काढण्याचे टप्पे

१. उत्पन्न. तुमच्या उत्पन्नाचा हिशोब करतांना वापरलेले आकडे घेणे (कृती ३ अ, टप्पा ३).
   वजा करणे.

२. खर्च करणे. तुम्ही दरवर्षी खर्च करीत असलेली रक्कम घेणे. (कृती ३ ब, टप्पा ३)

३. उत्तर-तुमचे उत्पन्न आणि खर्च यांचे संतुलन दाखवेल.

### लक्ष्मीचे उत्पन्न, खर्च आणि शिल्लक

| | **मासिक** | **वार्षिक** |
|---|---|---|
| उत्पन्न | ११,१६७ | १३४,००० |
| -(वजा) | | |
| खर्च | १०,४७५ | १२५,७०० |
| | **६९२** | **८,३००** |

**सारांशासाठी :**
**उत्पन्न - खर्च = शिल्लक**
**लक्ष्मी महिन्याला रु. ६९२ आणि वर्षाला रु. ८,३०० बचत करते.**

## सत्र ४ : तुमच्या पैशाचे व्यवस्थापन

## कृती ४ अ : उत्पन्न आणि खर्चाचे संतुलन

### तुमच्या कुटुंबाचे उत्पन्न आणि खर्चाचे संतुलन पत्रक

| १. तुमचे वार्षिक उत्पन्न काय आहे (पहा कृती ३ अ) | २. वजा करा. | ३. तुमचा वार्षिक खर्च काय आहे (पहा कृती ३ ब) | ४. उत्तर तुमचे उत्पन्न आणि तुमचा खर्च यामध्ये संतुलन आहे का? |
|---|---|---|---|
| | | | |

### तुमचे उत्पन्न आणि खर्चाचे संतुलन

| | **मासिक** | **वार्षिक** |
|---|---|---|
| उत्पन्न | | |
| – | | |
| खर्च | | |

**तुमच्या मासिक उत्पन्नातून खर्च वजा केल्यावर किती रुपये शिल्लक राहतात?**

**तुमच्या वार्षिक उत्पन्नातून खर्च वजा केल्यावर किती रुपये शिल्लक राहतात?**

**तुम्ही तुमच्या उत्पन्नापेक्षा जास्त की कमी खर्च करता?**

## सत्र ४ : तुमच्या पैशाचे व्यवस्थापन

## कृती ४ ब सूचना : बचत योजना तयार करणे

**४.४ कृती ४ ब ची प्रस्तावना करून देणे :**

प्रत्येकाला हे माहीत आहे, की आपल्या कुटुंबाच्या इच्छेच्या किंवा गरजेच्या देखील वस्तू खरेदी करण्यासाठी आपल्याकडे पुरेसा पैसा नसतो. कृती ५ ब मध्ये तुम्हाला जेव्हा जास्त गरज किंवा इच्छा असते तेव्हा पुरेसा पैसा बाजूला काढून ठेवण्याची सोपी तंत्रे तुम्ही पहाल.

सत्र १ मध्ये तुम्ही तुमच्या कुटुंबासाठी असणाऱ्या तुमच्या स्वप्नाची यादी केलेली आहे. कृती ५ ब मध्ये त्यापैकी एखादे स्वप्न वास्तवात आणण्यासाठी मदत मिळणाऱ्या जलद आणि सोप्या बचतीच्या योजना तयार कराल.

**४.५ ध्येय :** तुमच्या बचतीचे ध्येय गाठण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बचतीची आकडेवारी कशी काढावी हे समजून घेणे.

१. लक्ष्मीची कथा आणि तिने तिचे बचतीचे लक्ष्य गाठण्यासाठी वापरलेल्या बचतीच्या योजनेचा आढावा घेणे. गटामध्ये तुम्ही लक्ष्मीच्या बचत योजनेशी सहमत आहात काय? का? (१० मिनिटे)

२. सत्र १ मध्ये तुम्ही तुमच्या कुटुंबासाठी पाहिलेल्या स्वप्नाच्या यादीपैकी एक निवडणे. त्या स्वप्नासाठीच्या तुमच्या बचत योजनेचा आराखडा तयार करण्यासाठी सहभागी जोडीने पत्रक भरणे. (१० मिनिटे)

३. तुमच्या योजनेची तुमच्या गटामध्ये चर्चा करा. तुम्ही किती काळपर्यंत बचत करायचे ठरविले आहे? तुम्ही तेवढा कालावधी का निर्धारीत केला? (१० मिनिटे)

**१. लक्ष्मीची बचत योजना वाचणे.** लक्ष्मीच्या बचत योजनेचे वाचन करणे आणि तिने तिचे बचतीचे लक्ष्य गाठण्यासाठी दर आठवड्याला किती बचत करायची याची केलेली आकडेवारी तुमच्या गटामध्ये समजावून घेणे. (१० मिनिटे)

**२. तुमचे बचतीचे ध्येय निवडणे आणि बचत योजना पूर्ण करणे.** तुमचे ध्येय गाठण्यासाठी तुम्हाला आठवड्याला किती बचत करावी लागेल यांचा सहभागी जोडीने हिशोब करणे. (१० मिनिटे)

३. तुमची बचत योजना आणि तुमचे ध्येय गाठण्यासाठी तुम्ही किती काळ निर्धारीत केला आहे याची गटामध्ये चर्चा करणे. (१० मिनिटे)

## सत्र ४ : तुमच्या पैशाचे व्यवस्थापन

## कृती ४ ब : बचत योजना तयार करणे

### लक्ष्मीचे तिच्या कुटुंबासाठीचे स्वप्न

लक्ष्मीला तिच्या कुटुंबासाठी काही कोंबड्या खरेदी करायच्या आहेत. त्या कोंबड्या तिच्या नवऱ्याच्या व्यवसायासाठी पुरेशी अंडी देतील. त्यामुळे त्याला अंडी खरेदी करण्याची गरज भासणार नाही अशी तिला आशा होती. सगळे व्यवस्थित झाले तर लक्ष्मी अंडी किंवा नंतर कोंबड्या देखील विकू शकेल.

लक्ष्मीचा नवरा दररोज सरासरी १६ पॅनकेक विकतो, त्यासाठी त्याला दोन अंड्यांची गरज असते. लक्ष्मीने दोन कोंबड्या आणि एक कोंबडा खरेदी करायचे ठरविले. सगळे व्यवस्थित झाले तर, लवकरच तिच्याकडे जास्त कोंबड्या असतील. ती बाजारात जाते. तिथे ती रु. ७०० ला तीन कोंबड्या खरेदी करू शकते असे तिला आढळून आले. तिने कोंबड्या खरेदी करण्यासाठी पैशाची बचत करायचे ठरविले आणि बचत योजना तयार केली.

**सूचना...**
**प्रत्येक आठवड्याला तुम्हाला किती बचत करावी लागेल याची आकडेवारी काढण्यासाठी, तुमच्या बचतीच्या रकमेला आठवड्याच्या संख्येने विभाजित करा.**
**लक्ष्मीच्या बचतीचे ध्येय रु. ७०० आहे, तिने एक महिना आणि एक वर्षामध्ये तिचे बचत ध्येय गाठण्यसाठी आठवड्याला किती बचत करायची याचा हिशोब खाली दिलेला आहे.**

**लक्ष्मीची बचत योजना**

| **बचत ध्येय** | **दोन कोंबड्या आणि एक पिल्लू खरेदी करणे** | **आकडेवारी** |
|---|---|---|
| ध्येयाची रक्कम | रु. ७०० | |
| लक्ष्मीला तिचे बचतीचे लक्ष्य एक महिन्यामध्ये गाठण्यासाठी दर आठवड्याला किती बचत करावी लागेल. | रु. १७५ | रु. ७०० ÷ ४ आठवडे |
| जर तिला तीन महिन्यामध्ये कोंबड्या खरेदी करायच्या असतील. | रु. ५८ | रु. ७०० ÷ १२ आठवडे |
| जर तिला सहा महिन्यामध्ये कोंबड्या खरेदी करायच्या असतील. | रु. २९ | रु. ७०० ÷ २४ आठवडे |
| जर तिला एका वर्षामध्ये कोंबड्या खरेदी करायच्या असतील. | रु. १३ | रु. ७०० ÷ ४८ आठवडे |
| **निर्णय** | लक्ष्मीने कोंबड्या खरेदी करण्यासाठीची बचत तीन महिन्यात करायचे ठरविले. | |

| सत्र ४ : तुमच्या पैशाचे व्यवस्थापन | | |
|---|---|---|
| **कृती ४ ब : बचत योजना तयार करणे** | | |
| **तुमच्या कुटुंबासाठी तुमचे स्वप्न** | | |
| तुमचे स्वप्न/बचत ध्येय काय आहे?<br>त्याची किंमत किती आहे? | | |
| **लक्षात घ्या... तुम्हाला प्रत्येक आठवड्याला किती बचत करणे गरजेचे आहे? त्याचा हिशोब करा.<br>बचत ध्येय किंमत ÷ आठवड्याची संख्या = आठवड्याची बचतीची गरज** | | |
| **तुमची बचत योजना** | | |
| **तुमचे बचत ध्येय** | | |
| **तुमच्या ध्येयाची किंमत** | | |
| **आकडेवारी** | | |
| तुमचे बचतीचे ध्येय एक महिन्यामध्ये गाठण्यासाठी तुम्हाला प्रत्येक आठवड्याला किती बचत करावी लागेल? | | ÷ ४ आठवडे |
| तीन महिन्यामध्ये? | | ÷ १२ आठवडे |
| सहा महिन्यामध्ये? | | ÷ २४ आठवडे |
| एका वर्षामध्ये? | | ÷ ४८ आठवडे |
| **निर्णय :** तुमचे बचत ध्येय गाठण्यासाठी तुम्हाला किती काळ बचत करावी लागेल? | | |
| तुमच्या निर्णयाची दोन कारणे कोणती? | | |

## सत्र ४ : तुमच्या पैशाचे व्यवस्थापन

## कृती ४ क सूचना : कुटुंबाचे अंदाजपत्रक तयार करणे

४.६ **कृती ४ क ची प्रस्तावना करून देणे :**

कृती ४ क मध्ये तुम्हाला तुम्ही सत्र ३ आणि ४ मध्ये केलेल्या हिशोबाचे एकत्रीकरण करून कौटुंबिक अंदाजपत्रक तयार करायचे आहे.

अंदाजपत्रक असे साधन आहे जे तुमच्या कुटुंबाला तुमच्या पैशाची आवक व जावक याचा निर्णय घेण्यासाठी वापरले जाऊ शकते. यामुळे तुमच्याकडे किती पैसा येत आहे आणि जात आहे हे पाहण्यास मदत मिळेल आणि अशा प्रकारे तुम्हाला गरजेच्या वस्तूसाठी पैसे देण्यासाठी आणि इच्छेच्या वस्तूसाठी बचत करण्यासाठी मदत करेल.

सत्र ३ मध्ये, तुम्ही तुमच्याकडे किती पैसा येतो आणि तुम्ही तुमचा पैसा कोठे खर्च करता याचा हिशोब केलेला आहे. सत्र ४ मध्ये, तुम्ही तुमचे बचत/खर्च संतुलन याचा हिशोब केला आहे आणि पैशाची बचत करण्यास मदत करण्याचे सोपे साधन शिकला आहात.

या कृतीत, तुमच्या पैशाचे नियोजन करण्यासाठी विस्तृत कल्पना येण्यासाठी आणि तुम्ही तुमचे आर्थिक नियंत्रण करण्यासाठी अंदाजपत्रक तयार कराल.

४.७ **ध्येय :** तुमचे सध्याचे उत्पन्न आणि खर्चाच्या सवयी, तसेच तुमच्या कुटुंबाची आर्थिक ध्येये आणि स्वप्ने यांची ओळख झाल्यानंतर तुम्हाला असे वाटेल की तुम्ही कोणत्या क्षेत्रामध्ये तुमच्या आर्थिक सुधारणा करू शकता. कृती ४ क मध्ये तुम्ही तुमच्या कुटुंबासाठी पुढील सहा महिन्याचे अंदाजपत्रक तयार कराल.

**सूचना :**

१. तुमच्या उत्पन्नाचा नकाशा तयार करणे. तुमच्या कुटुंबाच्या उत्पन्नाचे पत्रकामधील (कृती ३ अ, टप्पा ३) माहितीचा वापर तुमच्या अंदाजपत्रकातील वार्षिक उत्पन्नाचा विभाग भरण्यासाठी करणे आणि तुमच्या उत्पन्नाची सहभागी जोडीने बेरीज करणे. (१० मिनिटे)

२. तुमच्या खर्चाचा हिशोब सहभागी जोडीने करणे. (१५ मिनिटे)

   अ. प्रथम गरजेच्या वस्तूवरील तुमचा खर्च तुमच्या कुटुंबाच्या खर्चाच्या पत्रकामधील माहितीचा वापर करून लिहिणे (कृती ३ ब, टप्पा ३)

   ब. दुसऱ्यावेळी तुमचे बचत ध्येय गाठण्यासाठी तुम्हाला किती पैसा बाजूला काढावा लागेल ते लिहिणे (कृती ४ ब)

   क. तिसऱ्या वेळी, इच्छेच्या वस्तूवरील तुमचा खर्च तुमच्या कुटुंबाच्या खर्चाच्या पत्रकामधील माहितीचा वापर करून लिहिणे (कृती ३ ब, टप्पा ३)

३. शिल्लक काढणे. उत्पन्न आणि खर्चाच्या बेरजेचा वापर करून उत्पन्न/खर्चाच्या संतुलनाचा हिशोब करणे. अंदाजपत्रकामध्ये तुमच्या उत्पन्नापेक्षा तुम्ही जास्त खर्च करीत असाल तर काही वस्तूवरील खर्च सहभागी जोडीने कमी करणे. (१० मिनिटे)

४. तुमच्या अंदाजपत्रकावर गटामध्ये चर्चा करणे. तुम्ही तुमच्या अंदाजपत्रकाचे संतुलन करू शकता का? सर्व सहभागी त्यांच्या अंदाजपत्रकाचे संतुलन ठेवत आहेत, याची खात्री करण्यासाठी थोडा वेळ घेणे. तुमच्या कुटुंबाच्या खर्चाच्या पत्रकामध्ये जर तुमच्या खर्चाचे पत्रक हे तुमच्या खर्चापेक्षा वेगळे आहे असे आढळले आहे का? (१० मिनिटे)

## सत्र ४ : तुमच्या पैशाचे व्यवस्थापन

## कृती ४ क सूचना : कुटुंबाचे अंदाजपत्रक तयार करणे

### १. तुमच्या उत्पन्नाचे मापन करणे.

अंदाजपत्रकातील उत्पन्न विभाग, टप्पा ३ मध्ये विकसित केलेल्या मासिक उत्पन्न पत्रकातील (कृती ३ अ) माहितीचा वापर करून सहभागी जोडीने लिहणे. (१० मिनिटे)

### २. तुमच्या बचत योजनेचा हिशोब करणे.

तुमच्या नवीन अंदाजपत्रकामध्ये तुम्ही किती खर्च कराल याचा हिशोब सहभागी जोडीने करणे. (१५ मिनिटे)

अ. तुमच्या गरजेच्या वस्तूचा खर्च लिहिणे.

तुम्ही कृती ३ ब, टप्पा ३ मध्ये विकसित केलेल्या तुमच्या खर्चाच्या पत्रकातील माहिती वापरुन तुमच्या अंदाजपत्रकातील संबंधित रकाने सहभागी जोडीने लिहिणे.

ब. तुमच्या बचतीचे ध्येय लिहा.

तुम्ही कृतीमध्ये विकसित केलेल्या बचत योजनेच्या माहितीचा वापर करून तुमच्या अंदाजपत्रकातील रकाने सहभागी जोडीने लिहिणे.

क. तुम्हाला समजलेल्या इच्छांच्या वस्तूंचा खर्च लिहिणे.

तुम्ही कृती ३ ब, टप्पा ३ मध्ये विकसित केलेल्या तुमच्या खर्चाच्या पत्रकातील माहिती वापरुन तुमच्या अंदाजपत्रकातील संबंधित रकाने सहभागी जोडीने लिहिणे.

### ३. संतुलनाचा शोध घेणे.

तुमच्या अंदाजपत्रकातील शिलकीचा शोध घेण्यासाठी तुमच्या उत्पन्नाच्या बेरजेमधून तुमच्या खर्चाची बेरीज वजा करणे. तुमच्या अंदाजपत्रकामध्ये तुम्ही जास्त खर्च करता असे आढळले तर तुमचा खर्च कोठे कमी करता येईल ते ओळखा, म्हणजे तुमचे अंदाजपत्रक संतुलित होईल. (१० मिनिटे)

### ४. चर्चा करणे.

तुमच्या अंदाजपत्रकाची गटामध्ये चर्चा करणे. तुम्ही तुमच्या खर्चाची योजना बदलली आहे काय? तुम्हाला अंदाजपत्रक संतुलित करता येईल काय? (१० मिनिटे)

## सत्र ४ : तुमच्या पैशाचे व्यवस्थापन

## कृती ४ क : कुटुंबाचे अंदाजपत्रक तयार करणे

**मार्गदर्शक. तुमचे कौटुंबिक अंदाजपत्रक कसे तयार करावे : तुमचे कौटुंबिक अंदाजपत्रक तयार करताना मार्गदर्शनाचे पालन करणे आणि तुम्हाला दिलेल्या पत्रकावर तुमच्या उत्तराची नोंद करणे.**

**तुमच्या मासिक अंदाजपत्रकाचा नकाशा तयार करणे.**

कृती ३ अ, टप्पा ३ मध्ये तुम्ही तुमच्या मासिक उत्पन्नाचे स्रोत आणि तुमचे उत्पन्न किती आहे याची नोंद केलेली आहे. त्या माहितीचा वापर करून तुमच्या कौटुंबिक अंदाजपत्रकातील मासिक उत्पन्नाचा विभाग लिहिणे.

वार्षिक बेरजेसाठी उत्पन्न विभागाला १२ ने गुणणे.

उदा. लक्ष्मीचे मासिक वेतन रु. ३,००० आहे. तिचे वार्षिक वेतन आहे:

रु. ३,००० x १२ = ३६,०००

**तुम्ही कितपत खर्च करू शकता आणि तुम्हाला ते कोठे खर्च करायचे आहेत हे शोधणे.**

तुमच्या अंदाजपत्रकाचा उद्देश तुमच्या कुटुंबाच्या आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा करणे, संकटकालीन सोय करणे आणि तुमचे आर्थिक ध्येय गाठण्यासाठी मदत करणे हा आहे.

कृती ४ अ मध्ये, तुम्ही उत्पन्न आणि खर्चाच्या संतुलनाचा हिशोब केलेला आहे, त्यामुळे खर्च कमी करणे हा तुमच्या अंदाजपत्रकाचा महत्वाचा भाग असल्याचे निश्चित झाले आहे.

तुम्ही तुमच्या अंदाजपत्रकातील खर्चाचा विभाग लिहिताना, तुमचा खर्च तुमच्या उत्पन्नापेक्षा जास्त होऊ नये हे लक्षात ठेवले आहे.

१. कृती ५ अ मध्ये तुम्ही तुमच्या गरजेच्या आणि इच्छेच्या वस्तूवरील खर्चाची नोंद केलेली आहे. तुमच्या खर्चाच्या पत्रकामधील सर्व गरजेच्या वस्तूंचा खर्च अंदाजपत्रकामध्ये लिहिणे.
२. तुम्ही कृती ४ ब मध्ये निर्धारित केलेल्या बचत योजनेचा वापर करून बचत ध्येय रकान्यात लिहिणे.
३. तुमच्या खर्चाचे पत्रक आणि आवश्यक वस्तूवरील खर्च याकडे मागे वळून पाहिल्यास, या खर्चाच्या वस्तू तुमच्या अंदाजपत्रकात मिळवणे, तुमच्या उत्पन्नापेक्षा तुमचा खर्च जास्त होणार नाही याची खात्री करणे. शेवटी, तुमच्या प्रत्येक महिन्याच्या आणि संपूर्ण वर्षाच्या खर्चाची बेरीज मिळवणे.

**शिल्लक शोधणे**

कृती ४ अ मध्ये तुम्ही शिकलेल्या कौशल्याचा वापर करून तुमच्या खर्चाच्या संतुलनाचा हिशोब करणे.

**एकूण उत्पन्न - एकूण खर्च = शिल्लक**

तुमच्या अंदाजपत्रकामध्ये जर तुम्ही तुमच्या उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करीत असाल तर शिल्लक किंवा बचत येईपर्यंत तुमच्या खर्चाचे आकडे जुळवून घेणे.

## सत्र ४ : तुमच्या पैशाचे व्यवस्थापन

### कृती ४ क : कुटुंबाचे अंदाजपत्रक तयार करणे

| | उत्पन्न | महिना १ | महिना २ | महिना ३ | महिना ४ | महिना ५ | महिना ६ | वार्षिक बेरीज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | एकूण उत्पन्न | | | | | | | |
| | खर्च | | | | | | | |
| १ कौटुंबिक | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| २ घरगुती | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| ३ व्यवसाय किंवा नोकरी | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| ४ सामुदायिक | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| ५ समारंभ | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| ६ आपातस्थिती | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| बचत ध्येय | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | एकूण खर्च | | | | | | | |
| | शिल्लक | | | | | | | |

| | |
|---|---|
| | **सत्र ५ : तुमच्या पैशाच्या सुरक्षेची रणनीति** |
| ५.१ | **सत्र ५ ची प्रस्तावना करून देणे :**<br>तुमच्या अंदाजपत्रकाचे पालन करणे हा तुमच्या पैशाच्या संरक्षणाचा एक मार्ग आहे. तुमच्या व्यवसायामध्ये गुंतवणूक करण्याइतकी बचत करण्यामुळे तुमचा पैसा वाढायला मदत मिळेल, तुमच्या इच्छेच्या वस्तूसाठी केलेल्या बचतीमुळे तुम्ही कर्ज टाळू शकाल.<br>आयुष्य नेहमी आपल्या योजनेप्रमाणे जात नसते, त्यामुळे या सत्रामध्ये तुम्ही तुमच्या पैशाचे संरक्षण करण्याची नीति पाहणार आहात. प्रथम आपल्या कुटुंबाला सुरक्षित पातळीवर आणा. अंदाजपत्रकाप्रमाणे काम करण्यासाठी तुम्ही त्यांना एकत्र आणाल. दुसरे, अवघड किंवा अनपेक्षित स्थितीला सामोरे कसे जायचे हे तुम्ही पहाल. एका नीतिमुळे तुमचा पैसा बँकेत किंवा सामुदायिक बचत गटाकडे सुरक्षित आहे. अन्य नीति ठेवणे म्हणजे विमा; हे असे साधन आहे, की ज्यामुळे तुम्ही योजना केली नसेल अशा वाईट घटनेपासून तुमच्या कुटुंबाला वाचण्यास मदत मिळेल. |
| | **कृती ५ अ सूचना : तुमच्या कुटुंबात सहमती आणणे** |
| ५.२ | **कृती ५ अ ची प्रस्तावना करून देणे :**<br><br>तुमचे बचत ध्येय जर तुमच्या कुटुंबाला साध्य करायचे असेल आणि तुमच्या कुटुंबाच्या अंदाजपत्रकाचे पालन करायचे असेल तर कुटुंबातील प्रत्येक सदस्याला एकत्रित काम करावे लागेल.<br>कुटुंबातील जे सदस्य बहुतांश उत्पन्न मिळवितात आणि जे बहुतांश खर्च करतात त्यांची योजनेशी सहमती असणे हे सगळ्यात महत्त्वाचे आहे.<br>तुमच्या कुटुंबातील अन्य सदस्याची देखील भूमिका असते, तुमची बहीण किंवा काकांचा अपघात झाला किंवा पैसे मागितले तर तुम्ही काय कराल? |
| ५.३ | **ध्येय :** सबंध रणनीति तयार करणे, त्यामुळे तुमचे कुटुंब तुमच्या अंदाजपत्रकाचे पालन करेल आणि तुमचे आर्थिक ध्येय साध्य होईल.<br><br>१. लक्ष्मीची कथा आणि तिने तिच्या कुटुंबाचे ध्येय साध्य करण्यासाठी वापरलेल्या नीतिचे गटामध्ये वाचन करणे. (३ मिनिटे)<br>२. ''प्रमुख मिळकत आणि खर्च करणारे पत्रक'' भरणे, त्यामध्ये तुमच्या कुटुंबातील बहुतांश मिळवते आणि जे बहुतांश खर्चाला जबाबदार आहेत त्यांची नोंद करणे. तुमच्या कुटुंबाला तुमच्या अंदाजपत्रकाचे पालन करण्यासाठी प्रेरणा देऊ शकणाऱ्या नीतिची यादी सहभागी जोडीने करणे. (१० मिनिटे)<br>३. तुमच्या कुटुंबातील सदस्यांना सुरक्षित पातळीवर आणण्याच्या नीतिची गटामध्ये चर्चा करणे. (१० मिनिटे) |

## सत्र ५ : तुमच्या पैशाच्या सुरक्षेची रणनीति

## कृती ५ अ सूचना : तुमच्या कुटुंबाला सुरक्षित पातळीवर आणणे

**१. लक्ष्मीची कथा वाचणे.**

लक्ष्मीने तिचे अंदाजपत्रक आणि बचत ध्येय साध्य करण्यासाठी तिच्या कुटुंबाला सुरक्षित पातळीवर आणण्यासाठी वापरलेल्या नीतिचे तुमच्या गटामध्ये वाचन करणे. (३ मिनिटे)

**२. प्रमुख मिळवते आणि खर्च करणारे पत्रक भरणे आणि त्यांना तुमच्या योजनेप्रमाणे वर आणण्यासाठीच्या नीतिचा विचार करणे.**

तुमच्या यशाची जास्तीत जास्त शक्यता असणाऱ्या लोकांना तुमच्या योजनेमध्ये समाविष्ट करून घेण्याच्या मार्गाचा सहभागी जोडीने विचार करणे. (१० मिनिटे)

**३. चर्चा करणे.**

तुमची नीति इतरांना सांगणे आणि पालन करायच्या तंत्राचा विचार गटामध्ये करणे. (१० मिनिटे)

**लक्ष्मीची कथा : कुटुंबाला वर आणणे**

लक्ष्मीच्या कुटुंबामध्ये ती आणि तिचा नवरा हे प्रमुख मिळवते आहेत. कुटुंबाच्या पैशाचे नियमन आणि पैसे खर्च करण्याची बहुतांश जबाबदारी लक्ष्मी घेते. तथापि, तिला माहीत आहे की तिच्या नवऱ्याच्या मदतीशिवाय तिचे कुटुंब तिचे बचत ध्येय साध्य करू शकणार नाही. लक्ष्मीच्या नवऱ्याची महत्वाची भूमिका आहे आणि त्याला वर आणण्याची तिला गरज आहे.

लक्ष्मी तिच्या नवऱ्याशी बोलली आणि कोंबड्यासाठीची बचत योजना तिने त्याला दाखविली. तिची योजना पाहून तो खूश झाला आणि आपल्या व्यवसायाला लाभ होईल म्हणून आनंदित झाला. त्यामुळे योजना ही चांगली कल्पना असल्याने त्याने मान्य केले. तो तंबाखू किंवा दारुवर किती खर्च करतो हे लक्ष्मीला माहीत असल्याचे पाहून त्याला आश्चर्य वाटले. लक्ष्मीच्या अंदाजपत्रकामध्ये, तिने या विभगातील खर्चामध्ये बदल केला नाही. तिचा नवरा पुन्हा खूश झाला आणि कोंबड्यासाठी बचत करीत असताना इच्छेच्या वस्तूवरील खर्चामध्ये वाढ होऊ न देण्याचे त्याने मान्य केले.

लक्ष्मी तिच्या मुलांशी बोलली. ती खूप लहान असल्यामुळे ते पैसे खर्च करत नाहीत. तथापि, लक्ष्मीला कल्पना सुचली. ती मुलांच्या नाश्त्यावर, गोळयांवर महिन्याला रु. २०० खर्च करते आणि ती मुलांना एकमतावर आणू शकते असे तिने ठरविले. मुलांसाठी गोळया स्वत: खरेदी करण्यापेक्षा तिने ठरविले की त्यांना त्यांच्या आवडीप्रमाणे खर्च करण्यासाठी ती महिन्याला रु. २०० देईल. तिने स्पष्ट केले की त्यांना जास्त पैसे (किंवा नाश्ता) मिळणार नाहीत, परंतु ते त्यांच्या आवडीप्रमाणे काहीही खरेदी करू शकतात. तिने त्यांना गोळ्यांपेक्षा जास्त काही खरेदी करण्यासाठी त्यांची स्वत:ची बचत योजना तयार करायला सांगितली. नवीन कल्पनेमुळे मुले उल्हासित झाली.

## सत्र ५ : तुमच्या पैशाच्या सुरक्षेची रणनीति

## कृती ५ अ सूचना : तुमच्या कुटुंबात सहमती आणणे

### प्रमुख मिळवते आणि खर्च करणारे पत्रक

तुमच्या कुटुंबामध्ये पैसे कोण मिळवतो? ______

* पुरुष? होय असेल तर, कोण? ______
* महिला? होय असेल तर, कोण? ______
* तरुण मुले? होय असेल तर, कोण? ______
* लहान मुले? होय असेल तर, कोण? ______
* प्रत्येकजण? होय असेल तर, कोण? ______

### तुमच्या कुटुंबात सहमती आणण्यासाठीची नीति

तुमच्या कुटुंबातील प्रमुख मिळवते आणि खर्च करणाऱ्यांमध्ये तुम्ही करणाऱ्या बदलांबद्दल सहमती असणे महत्वाचे आहे. तुमच्या योजनेचे यश त्यांच्या सहकार्यावर आधारित आहे. तुमच्या योजनेतील प्रमुख भूमिका पार पाडणाऱ्यांना, तुम्हाला सहकार्य करणाऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठीच्या कल्पनांची नोंद करण्यासाठी या जागेचा वापर करणे.

* ______
* ______
* ______
* ______
* ______
* ______
* ______
* ______

## सत्र ५ : तुमच्या पैशाच्या सुरक्षेची रणनीति

## कृती ५ ब सूचना : कोठे पैसे वाचवावेत?

| | |
|---|---|
| ५.४ | **कृती ५ ब ची प्रस्तावना करून देणे :**<br>या कृतीमध्ये तुम्ही बचतीचे विविध पर्याय पहाल. अनपेक्षित कारणासाठी बँकेत किंवा बचत गटामध्ये बचत करण्याच्या योजनेचा एक मार्ग आहे. तुमचे कुटुंब बचत करण्याचे आणि तुमच्या अंदाजपत्रकाचे पालन करण्याचे चांगले काम करीत असेल, परंतु तुम्ही अनपेक्षित कारणासाठीचा खर्च कसा करणार? मित्र किंवा नातेवाईकाला पैशाची गरज असेल तर तुम्ही काय कराल? तुमच्या घरामध्ये चोरी झाली तर काय?<br>तुमची बचत घराबाहेर ठेवल्यामुळे तुमच्या पैशाला संरक्षणासाठी मदत मिळेल, तुमचे पैसे वाढण्यास मदत मिळेल, आणि बचतीमधून खर्च करण्याची शक्यता मर्यादित करता येईल आणि तुमची योजना सुरक्षित राहील. |
| ५.५ | **ध्येय :** बचत करण्याचे विविध उपलब्ध पर्याय समजावून घेणे आणि तुमच्या गरजेसाठी सर्वोत्तम पर्याय निवडीचा निकष ओळखणे.<br><br>१. बचत सेवांचा परिचय आणि लक्ष्मीने कोठे पैसे वाचविले त्याचे वाचन गटामध्ये करणे. (१० मिनिटे)<br>२. बलस्थाने आणि मर्यादा पत्रक भरणे, लक्ष्मीने तिचे कुटुंब तिच्या नवीन अंदाजपत्रकापूर्वी आणि त्याच्या वापरानंतर तिने पैशाची कोठे बचत केली? त्याची बलस्थाने आणि मर्यादा याची सहभागी जोडीने नोंद करणे. (१० मिनिटे)<br>३. तुम्ही नोंदलेल्या बलस्थानांची आणि मर्यादाची गटामध्ये चर्चा करणे. या बाबी तुम्हाला लागू होतात काय? तुम्ही कोठे बचत करता याबद्दल तुम्ही समाधानी आहात काय? (१० मिनिटे) |
| | **१. बचत सेवांच्या परिचयाचे**<br>आणि लक्ष्मीच्या कथेचा गटात आढावा घेणे. (१० मिनिटे)<br><br>**२. बलस्थाने आणि मर्यादा पत्रक भरणे.**<br>बलस्थाने आणि मर्यादा पत्रक भरणे, लक्ष्मीने तिचे कुटुंब तिच्या नवीन अंदाजपत्रकापूर्वी आणि त्याच्या वापरानंतर तिने पैशाची कोठे बचत केली, त्याची बलस्थाने आणि मर्यादा याची नोंद सहभागी जोडीने करणे. (१० मिनिटे)<br><br>**३. चर्चा करणे.**<br>तुम्ही ओळखलेली बलस्थाने आणि मर्यादा याची गटामध्ये चर्चा करणे. त्यामधील तुम्हाला काही लागू होते का? तुम्ही कोठे बचत करता याबद्दल तुम्ही समाधानी आहात काय? (१० मिनिटे) |

## सत्र ५ : तुमच्या पैशाच्या सुरक्षेची रणनीति

## कृती ५ ब सूचना : पैसे कोठे वाचवावेत?

**प्रस्तावना**

पैशाच्या बचतीचे अनेक पर्याय आहेत. त्याची मर्यादा अनौपचारिक ते औपचारिक अशी आहे. बँकांसारख्या औपचारिक बचत संस्था, स्पष्ट नियम आणि नियमावलीचे पालन करतात, जे तुमचे संरक्षण करतात. अनौपचारिक सेवा या सामान्यत: व्यक्तिगत आणि सामुदायिक नेटवर्कच्या असतात आणि जास्त धोकादायक असू शकतात. औपचारिक आणि अनौपचारिक सेवांना फायदे आणि तोटे आहेत, त्याचा परिणाम होतो :

- तुम्ही किती सहजपणे सेवांचा लाभ घेऊ शकता.
- सेवा किती सुरक्षित आहे.
- सेवेचे मूल्य
- सेवेचा धोका

खालील आकडे तुम्हाला उपलब्ध बचत सेवांच्या मर्यादेची यादी देतात :

**बचत सेवा आणि औपचारिकता स्तर**

| लोक | सामुदायिक गट | नोंदणीकृत संस्था | नियमाधीन संस्था |
|---|---|---|---|
| नोकरदार<br><br>कुटुंब<br>मित्र<br>दुकानदार | स्वयं मदत गट | वित्तीय सहकारी संस्था | सूक्ष्म आर्थिक पुरवठा संस्था<br>बँक |

अनौपचारिक → औपचारिक

## सत्र ५ : तुमच्या पैशाच्या सुरक्षेची रणनीति

## कृती ५ ब सूचना : पैसे कोठे वाचवावेत?

### लक्ष्मीने निवडलेल्या बचत पर्यायाची कथा

***तिच्या कुटुंबाने नवीन अंदाजपत्रकाचे पालन करण्यापूर्वी***

लक्ष्मीने तिच्या पैशाचे संघटन आणि नवीन कौटुंबिक अंदाजपत्रक आणि बचत योजना यांचा निर्णय घेण्यापूर्वी, तिने बचत केलेला पैसा ती घरामध्ये ठेवत असे.

आपला पैसा नक्की कोठे आहे? हे माहीत असल्यामुळे तिला सुरक्षित वाटायचे आणि तिला आवश्यक असेल तेव्हा तो तिला उपलब्ध असायचा.

समस्या अशी होती की तिच्या सर्व कुटुंबाला माहीत होते की ती तिच्या पैशाबाबत सावध असते, म्हणून मावशी किंवा भाऊ किंवा चुलता तिच्याकडे पैसे मागायचे. लक्ष्मीला आपल्या कुटुंबाला मदत करायची इच्छा असायची, परंतु काहीतरी कारणासाठी केलेल्या बचतीचा प्रयत्न बऱ्याचदा प्रलंबित व्हायचा आणि तिचे कुटुंबातील सदस्य तिला पैसे परत करेपर्यंत तिला वाट पहायला लागायची याचा तिला त्रास व्हायचा.

लक्ष्मीला चिंता वाटत होती की तिच्या घरात कधी चोरी झाली किंवा आग लागली तर काय होईल.

**तिच्या कुटुंबाने नवीन अंदाजपत्रकाचे पालन केल्यानंतर**

लक्ष्मीने जेव्हा तिच्या नवीन अंदाजपत्रकाची सुरुवात केली, त्यावेळी अगोदर येणाऱ्या समस्या टाळण्यासाठी तिने तिचा पैसा वेगवेगळ्या ठिकाणी साठवावा असे ठरविले. तिने योजनेवरती अंमलबजावणी करण्याचा निर्धार केला आणि हे करण्यासाठी तिला जाणीव होती की तिला पैसा घराबाहेर साठवावा लागेल.

लक्ष्मीने तिला उपलब्ध असणाऱ्या पर्यायांसाठी आसपास चौकशी केली. तिने ठरवले की तिचे दोन सर्वोत्तम पर्याय म्हणजे एक तर बँकेत खाते उघडणे किंवा सामुदायिक बचत गटाशी जोडले जाणे हे होय.

**बँकेत खाते उघडण्यासाठी,** तिला ओळखपत्र, पत्त्याच्या पुराव्यासाठी घरगुती बील (वीज किंवा पाणी) दाखवावे लागेल आणि कमीत कमी रु. ५०० ठेव ठेवावी लागेल. ती तिचा पैसा बँकेतून किंवा कॅश कार्डचा वापर करून काढू शकेल. हे खाते मोफत आहे, परंतु तिच्या पैशावर तिला व्याज मिळणार नाही. बँकेत जाण्यासाठी तिला ३० मिनिटाचा प्रवास करावा लागेल.

**सामुदायिक बचत गटाशी जोडले जाणे,** तिला फक्त गटाच्या विद्यमान सदस्याने ओळख दिली पाहिजे आणि तिचे अनेक शेजारी सदस्य होते. सदस्य प्रत्येक महिन्याला निर्धारीत रक्कम भरायचे. ते सहा महिन्यासाठी खात्यामध्ये पैसे ठेवण्याच्या पर्यायाची निवड करू शकतात आणि ७% व्याज मिळवू शकतात. पर्यायाने ते गटाकडून कर्ज घेऊ शकतात, परंतु त्यांना त्यांचे कर्ज भरावे लागते.

लक्ष्मीने सामुदायिक बचत गटाला जोडले जाण्याचे ठरविले. ती तिचे बचत ध्येय प्रत्येक महिन्याला सामुदायिक कोषामध्ये ठेवेल आणि ७% व्याज मिळवेल, तिला खात्री होती की ती या पैशाशिवाय सहा महिने जगू शकते आणि ते पैसे काढणे सोपे नव्हते याचा तिला आनंद झाला.

सगळे जर व्यवस्थित झाले तर, नंतर ती बँकेत खाते उघडू शकेल, परंतु हे पाऊल उचलल्यामुळे ती खूष आहे.

## सत्र ५ : तुमच्या पैशाच्या सुरक्षेची रणनीति

### कृती ५ ब सूचना : पैसे कोठे वाचवावेत?

लक्ष्मीच्या बचत पर्यायाची बलस्थाने आणि मर्यादा

| पूर्वी | बलस्थाने | मर्यादा |
|---|---|---|
| घरामध्ये बचत | १. | १. |
| | २. | २. |
| | ३. | ३. |
| | ४. | ४. |
| **नंतर** | **बलस्थाने** | **मर्यादा** |
| सामुदायिक गटामध्ये बचत | १. | १. |
| | २. | २. |
| | ३. | ३. |
| | ४. | ४. |

## सत्र ५ : तुमच्या पैशाच्या सुरक्षेची रणनीति

## कृती ५ क सूचना : विमा काय आहे?

| | |
|---|---|
| ५.६ | **प्रस्तावना :**<br>तुम्ही प्रत्येक गोष्टीचे नियोजन करू शकत नाही, परंतु पूर्वतयारी असेल तर काही अंशी तुम्हाला परिस्थितीवर नियंत्रण ठेवता येऊ शकेल.<br><br>विमा तुम्हाला अनपेक्षित आपत्ती किंवा आपातस्थितीमध्ये पैसा पुरवून तुमचे रक्षण करू शकतो. तुम्हाला असे संरक्षण मिळण्यापूर्वी तुम्हाला विमा पुरवठादाराकडे फी भरणे आवश्यक आहे. ही फी तुम्हाला काही काळासाठी संरक्षण देईल, परंतु आपातस्थिती नंतर पैसे मिळू शकणार नाहीत.<br>कृती ५ क मध्ये, तुम्हाला उपलब्ध असणारे विमा पर्याय तुम्ही पहाल :<br><br>* विविध सेवा पुरवठादार<br>* विविध प्रकारचे विमा<br><br>हे तुम्हाला असणाऱ्या विविध पर्यायांची ओळख करून देतील आणि तुमच्या गरजेप्रमाणे पर्याय किंवा उत्तम पर्यायाची निवड करता येईल. |
| ५.७ | **ध्येय :** उपलब्ध असणाऱ्या विमा सेवांची मर्यादा समजावून घेणे आणि तुमच्या गरजेनुसार सर्वोत्तम पर्याय निवडण्याच्या साधनाचा विकास करणे.<br><br>१. प्रस्तावना आणि स्पष्टीकरणात्मक आकड्याचे गटामध्ये वाचन करणे. लक्ष्मीच्या कथेचा आढावा घेणे. (१० मिनिटे)<br>२. लक्ष्मीच्या कथेवरील प्रश्नाची उत्तरे सहभागीने जोडीने देणे (१० मिनिटे)<br>३. प्रश्नाच्या तुमच्या उत्तरांची गटामध्ये चर्चा करणे. लक्ष्मीने कोणता विमा पर्याय निवडावा याची चर्चा करणे. (१० मिनिटे) |

**१. विमा सेवांची प्रस्तावना आणि लक्ष्मीच्या कथेचा आढावा गटामध्ये घेणे.** (१० मिनिटे)

**२. लक्ष्मीच्या कथेवरील प्रश्नाची उत्तरे सहभागीने जोडीने देणे.**

प्रश्नामुळे तुम्हाला मूल्यमापन करायला मदत मिळेल की लक्ष्मीने निवडलेल्या विमा पर्यायाशी तुम्ही सहमत आहात किंवा नाही. (१० मिनिटे)

**३. चर्चा करणे.**

प्रश्नाच्या तुमच्या उत्तरांची गटामध्ये चर्चा करणे. लक्ष्मीने कोणता विमा पर्याय निवडावा याची चर्चा करणे. (१० मिनिटे)

## सत्र ५ : तुमच्या पैशाच्या सुरक्षेची रणनीति

## कृती ५ क सूचना : विमा काय आहे?

**प्रस्तावना :** आयुष्य धोक्यांनी भरलेले आहे, धोक्यांची जाणीव असल्यामुळे आणि त्यांचा सामना कसा करायचा हे माहीत असल्यामुळे समस्येचे रुपांतर आपत्तीमध्ये होण्यात प्रतिबंध होऊ शकतो.

विम्यामध्ये सर्व प्रकारच्या धोक्यांपासून संरक्षण मिळते. ज्यामध्ये तुम्हाला, तुमच्या कुटुंबाला, तुमच्या घराला आणि मालमत्ता तसेच व्यवसायाला असलेल्या धोक्याचा समावेश आहे.

विम्याचे पैसे मिळण्यासाठी, तुम्हाला विमा पुरवठादाराबरोबर विमा पॉलिसीवर सही करणे गरजेचे असते. त्यानंतर तुम्हाला निर्धारित काळासाठीची फी भरावी लागेल. फी भरली नाही तर, तुम्हाला विम्याचे पैसे मिळणार नाहीत.

बचत सेवाप्रमाणे, विमा पुरवठादाराची मर्यादा औपचारिक ते अनौपचारिक आहे, जो तुम्हाला विविध मार्ग, धोके आणि संरक्षणाचे स्तर देतो.

तुम्हाला कदाचित सर्व धोक्यांचा विमा उतरविता येणार नाही, म्हणून विमा पॉलिसी घेताना विचार करण्याच्या गोष्टी :

* माझ्या कुटुंबाला असलेला सर्वात मोठा धोका कोणता? आम्हाला विम्याशिवाय सगळ्यात मोठी हानी होण्याचे कारण काय?
* विमा पुरवठादाराबरोबर मी पॉलिसी कशी घेऊ? त्याचा खर्च किती?
* दुर्घटना जर घडली तर विम्याचे पैसे कसे मागू? मला किती पैसा मिळेल?

**कृती ४ : विमा सेवा आणि कव्हरेजचे प्रकार**

| | | |
|---|---|---|
| अनौपचारिक | **विमा पुरवठादार**<br>**अनौपचारिक**<br>**माध्यम**<br>कुटुंब<br>मित्र<br>स्वयं मदत गट | **विमा संरक्षण**<br>**तुमच्या कुटुंबाच्या संरक्षणासाठी असणारे उपलब्ध प्रकार**<br>**वैयक्तिक विमा**<br>अपघात आणि स्वास्थ्य विमा (उदा. जखम)<br>घर विमा (उदा. आग, महापूर, भूकंप या करिता)<br>**मालमत्ता विमा (उदा. चोरी)**<br>जीवन किंवा अपंगत्व विमा (उदा. जर तुम्ही जास्त वेळ काम करू शकत नसाल तर तुमचे कर्ज अदा करू शकते) |
| औपचारिक | **औपचारिक**<br>**माध्यम**<br>बँक<br>विमा कंपनी<br>पोस्ट ऑफिस<br>सूक्ष्म-वित्त पुरवठा संस्था | **व्यापारी विमा**<br>इमारत आणि सामुग्री विमा (उदा. आग, महापूर, भूकंप या करिता)<br>**अपराध विमा (उदा. चोरी)**<br>व्यापार भंग विमा (उदा. महापूरामुळे तुम्हाला जर व्यवसाय बंद करावा लागला तर भाडे भरण्यासाठी)<br>शेती विमा शेतकऱ्यांसाठी (उदा. दुष्काळामुळे पीक गेले किंवा रोगांनी प्राणी मेले) |

## सत्र ५ : तुमच्या पैशाच्या सुरक्षेची रणनीति

## कृती ५ क सूचना : विमा काय आहे?

### लक्ष्मीची कथा : लक्ष्मीने आपल्या विमा पॉलिसीची निवड कशी केली

**१. लक्ष्मीने ओळखले की तिच्या कुटुंबासाठी तिला सगळ्यात मोठा धोका कोणता आहे :**

- ✻ तिच्या नवऱ्याची वड्याची गाडी खराब झाली किंवा चोरीला गेली तर तिच्या कुटुंबाच्या उत्पन्नाच्या प्रमुख स्रोताची हानी होईल. नवीन गाडीची किंमत रु. १०,००० असेल आणि कुटुंबाला नवीन गाडी घेणे खूपच अवघड आहे.
- ✻ लक्ष्मी किंवा तिचा नवरा आजारी पडला किंवा जखमी झाला आणि ते काम करू शकत नसतील तर त्या कालावधीमधील उत्पन्न ते गमावतील.
- ✻ त्यांच्या घरी चोरी झाली किंवा महापूर अगर आगीमुळे त्यांच्या घराची हानी झाली तर त्यांना दुरुस्तीसाठी पैसे भरावे लागतील.

**२. तिने ठरविले की तिच्या नवऱ्याच्या वड्याच्या गाडीचा विमा उतरविणे सगळ्यात जास्त महत्त्वाचे आहे, कारण :**

- ✻ रस्त्यावरील अपघात आणि चोरी ही आगीपेक्षा जास्त वेळा होते.
- ✻ सरकारी स्वास्थ्य विमा आहे.
- ✻ ती आणि तिचा नवरा जोपर्यंत पैसे मिळवत राहतील तो पर्यंत ते व्यवस्थित असतील असे तिला वाटते.

**३. पुढील पायरी म्हणजे विमा पॉलिसीची निवड करणे. परत, लक्ष्मीला दोन चांगले पर्याय मिळाले.**

१. विमा कंपनी तिच्या नवऱ्याच्या वड्याच्या गाडीचा चोरी किंवा अपघातासाठी विमा उतरवेल. विमा उतरविण्यासाठी नवऱ्याला कंपनीकडे ओळखपत्र, गाडीच्या मालकीचा पुरावा आणि तो प्रत्येक रात्री गाडीला कुलुप लावत असल्याचा पुरावा द्यावा लागेल. त्याला एक वर्षाच्या विमा पॉलिसीसाठी रु. २,००० भरावे लागतील. गाडी खराब झाली किंवा चोरीला गेली तर कंपनी त्याला रु. ४,००० पेक्षा वरच्या नुकसानीचे जास्त पैसे देईल. विम्याचे पैसे मिळण्यासाठी,लक्ष्मीच्या नवऱ्याला चोरी किंवा खराबीच्या पुराव्याचा पोलीस रिपोर्ट विमा कंपनीला द्यावा लागेल. विमा कंपनीकडून पैसे मिळण्यासाठी शक्यतो दोन महिन्याचा कालावधी लागतो.

२. लक्ष्मीच्या गावात स्वयं मदत गट विमा संरक्षण देतो. लक्ष्मीने गटाशी बोलणी केली. तिला आढळले की तिचा नवरा गटाकडे त्याच्या गाडीच्या चोरी किंवा खराबीसाठी विमा उतरवू शकतो. गट त्याला ओळखत असल्यामुळे त्याला गाडीच्या मालकीचा पुरावा देण्याची गरज नाही. गाडीचा एक वर्षाचा विमा उतरविण्यासाठी त्याला रु. १,००० भरावे लागतील. गाडी खराब झाली किंवा चोरीला गेली तर गट रु. ३,००० पेक्षा वरच्या नुकसानीचे जास्त पैसे देईल. घटनेच्या आधारावर, ते पोलिस रिपोर्ट मागू शकतात, पण दोन्ही बाबतीत लक्ष्मीच्या नवऱ्याच्या गाडीला काय झाले आहे ते गटाला सांगून दोन आडवड्याच्या आत विम्याचे पैसे मिळवता येतील.

## सत्र ५ : तुमच्या पैशाच्या सुरक्षेची रणनीति

### कृती ५ क सूचना : विमा काय आहे?

| | प्रश्न | प्रेरकांसाठी उत्तरे |
|---|---|---|
| १. | नवीन पॅनकेक गाडी तयार करण्यासाठी किती खर्च येईल? | १०,००० |
| २. | विमा कंपनीचा प्रस्ताव पहा. लक्ष्मीच्या नवऱ्याला त्याच्या गाडीचा विमा बचत गटाकडे उतरविण्यासाठी कोणते दस्तावेज देण्याची गरज आहे? | फोटो ओळखपत्र, गाडीच्या मालकीचा पुरावा, प्रत्येक रात्री गाडीला कुलुप लावत असल्याचा पुरावा |
| ३. | गाडीचा एक वर्षाचा विमा उतरवण्यासाठी त्याला किती पैसे भरावे लागतील? | रु. २,००० |
| ४. | गाडी जर खराब झाली किंवा चोरीला गेली तर विमा कंपनीकडून पैसे मिळण्यापूर्वी त्याला किती पैसे भरावे लागतील? | रु. ४,००० |
| ५. | विमा कंपनी त्याला किती अधिक पैसे देऊ शकेल? | रु. ६,००० |
| ६. | विम्याचे पैसे मिळविण्यासाठी लक्ष्मीच्या नवऱ्याला काय करावे लागेल? | पोलिस रिपोर्ट करावा लागेल आणि तो रिपोर्ट विमा कंपनीला पाठवावा लागेल. |
| ७. | लक्ष्मीच्या नवऱ्याने पैसे मिळविण्यासाठी आवश्यक बाबी पूर्ण केल्यानंतर त्याला विम्याचे पैसे मिळायला किती वेळ लागेल? | सामान्यत: दोन महिने |
| ८. | स्वयं मदत गटाचा पर्याय पहा. स्वयं मदत गटाकडे विमा उतरविण्यासाठी लक्ष्मीच्या नवऱ्याला कोणते दस्तावेज द्यावे लागतील? | कोणताही दस्तावेज नाही |
| ९. | गाडीचा एक वर्षाचा विमा उतरविण्यासाठी त्याला किती पैसे भरावे लागतील? | रु. १,००० |
| १०. | गाडी जर खराब झाली किंवा चोरीला गेली तर स्वयं मदत गटाकडून पैसे मिळण्यापूर्वी त्याला किती पैसे भरावे लागतील? | रु. ३,००० |
| ११. | स्वयं मदत गट त्याला किती पैसे देऊ शकेल? | रु. ७,००० |
| १२. | विम्याचा क्लेम करण्यासाठी लक्ष्मीच्या नवऱ्याला काय करावे लागेल? | गट सदस्याशी बोलावे लागेल. चोरीचा पोलिस रिपोर्ट आवश्यक असेल तर गटाला पोलिस रिपोर्ट द्यावा लागेल. |
| १३. | लक्ष्मीच्या नवऱ्याला विम्याचे पैसे मिळायला किती वेळ लागेल? | जास्तीत जास्त दोन आठवडे |

## सत्र ६ : कृती नियोजन

## कृती ६ अ सूचना : कृती करणे

### १. कौटुंबिक आर्थिक स्वास्थ्याच्या टप्प्याचा आढावा गटामध्ये घेणे.
प्रशिक्षण कार्यक्रमामधून दिलेल्या टप्प्यांचा वापर करून महत्त्वाच्या टप्प्यांचा लाभ घेण्यासाठी आढावा घेणे. (५ मिनिटे)

### २. कृती टप्प्यांवर आधारित केलेल्या प्रगतीचे वैयक्तिक मूल्यमापन करणे.
तुमची प्रगती निश्चित करणारी प्रत्येक कृती टप्पा, तुम्ही घेतलेला निर्णय आणि तुमचा पुढील टप्पा यांचा आढावा घेणे. (१० मिनिटे)

### ३. चर्चा करणे.
प्रत्येक व्यक्ती तिने निवडलेल्या दोन सगळ्यात महत्त्वाच्या टप्प्यांची गटामध्ये निश्चिती करेल. (१० मिनिटे)

### ४. पुढील बैठकीचे नियोजन करणे.
तुम्ही ठरवा की गट म्हणून तुम्ही पुढील २-४ आठवड्यामध्ये तुमच्या कृतीच्या नियोजनाच्या प्रगतीच्या चर्चेसाठी कधी भेटायचे. (१० मिनिटे)

## कृती ६ अ : कृती करणे

**६.१** **ध्येय:** आजच्या प्रशिक्षणाचा संपूर्ण उपयोग करण्यासाठी गरजेच्या महत्त्वाच्या कृती टप्पयांचा सहभागीने आढावा घेणे.

१. कौटुंबिक आर्थिक स्वास्थ्याच्या या प्रशिक्षण सत्रामध्ये शिकलेल्या प्रत्येक महत्त्वाच्या टप्प्यांचा गटामध्ये आढावा घेणे. (५ मिनिटे)
२. वैयक्तिकरित्या तुम्ही प्रत्येक टप्पा पूर्ण केला आहे का याचे मूल्यमापन करा आणि तसे केल्यानंतर तुम्ही कोणता निर्णय घेतला आणि तुमचे पुढील टप्पे काय असतील? (१० मिनिटे)
३. प्रत्येक व्यक्तीने त्यांच्या कुटुंबाच्या आर्थिक स्वास्थ्य सुधारण्यासाठी ते करणार असलेल्या सगळ्यात महत्त्वाच्या दोन टप्प्यांची गटामध्ये यादी करणे. (१० मिनिटे)
४. प्रगतीची चर्चा करण्यासाठी पुन्हा केव्हा भेटायचे हे ठरवणे आणि पुढील २-४ आठवड्याच्या कार्य नियोजनाचा गटामध्ये आढावा घेणे. (१० मिनिटे)

**टीप :** गट सदस्यांनी इच्छा दाखविली तर प्रगतीच्या चर्चेसाठी नियमित बैठकींचे नियोजन करता येईल.

## सत्र ६ : कृती नियोजन

## कृती ६ अ : कृती करणे

**खाली दिलेल्या टप्प्यांपैकी कोणताही टप्पा तुम्ही पूर्ण केला आहे का, आणि असेल तर, त्यानंतर तुम्ही कोणता निर्णय घेतला आणि ते पूर्ण करण्यासाठी काही इतर टप्पे आहेत का?**

| | **बहुतांश आर्थिक सेवा घेण्याचे टप्पे** | **पूर्ण? (हो/ना)** | **तपशील** | **पुढील टप्पा** |
|---|---|---|---|---|
| १. | तुमच्या कुटुंबाचे उत्पन्न किती आहे आणि ते कोठून येते याचा अंदाज घेणे. | | | |
| २. | तुमच्या कुटुंबाच्या मासिक आणि वार्षिक खर्चाचा अंदाज घेणे. | | | |
| ३. | तुमच्या कुटुंबाच्या उत्पन्न आणि खर्चाच्या संतुलनाचा हिशोब करणे. | | | |
| ४. | बचत ध्येयाची निवड करणे आणि बचत नियोजन तयार करणे. | | | |
| ५. | बचत ध्येयासहित तुमच्या कुटुंबाचे अंदाजपत्रक तयार करणे. | | | |
| ६. | तुमच्या कुटुंबाला अंदाजपत्रकावर सहमती आणण्याची नीति बनवा. | | | |
| ७. | तुम्ही तुमच्या पैशाची कोठे बचत कराल त्याचे नियोजन करणे. | | | |
| ८. | तुमच्या विम्याच्या गरजेचे मूल्यमापन करणे आणि योग्य पॉलिसी कशी निवडायची ते समजून घेणे. | | | |

| सत्र ६ : कृती नियोजन | |
|---|---|
| ६.२ | **कृती ६ अचा निष्कर्ष :**<br>माहीत झालेल्या टप्प्यांचे महत्व ओळखणे आणि सहभागींना कृती करण्यास प्रोत्साहन देणे. |
| ६.३ | **मूल्यमापन पत्रकाची ओळख करून देणे :**<br>सातत्याने सुधारणा करण्याचा शोध घेणे, ही गोष्ट फक्त सहभागींकरताच महत्वाची आहे असे नसून या कार्यक्रमाच्या निर्मात्यांनाही हे खूप महत्वाचे वाटते आणि त्यांची आणखीही काहीतरी करण्याची इच्छा आहे. या बाबतीत सुधारणा करण्यास मदत मिळावी म्हणून ते तुम्हाला खालील फॉर्ममध्ये तुमच्या प्रामाणिक प्रतिक्रिया देण्याची विनंती करीत आहेत. |
| ६.४ | **मूल्यमापन पत्रकांचे वितरण करणे आणि सहभागींचा निरोप घेणे:**<br>पत्रकांचे वितरण करून प्रत्येकाला सांगा की, एकदा त्यांनी पत्रके भरून पूर्ण केली की, ते जाण्यासाठी मोकळे आहेत. आल्याबद्दल प्रत्येकाचे आभार माना आणि मूल्यमापन गोळा करण्यासाठी थांबा, आणि तो भरण्यात येणाऱ्या अडचणीसाठी प्रत्येकाला मदत करा. |
| ६.५ | **तुमच्या संघटनेला आणि/किंवा आयएलओला पुन्हा अहवाल/माहिती देणे.**<br>कार्यक्रम मूल्यमापन आणि सह्या केलेली पत्रके परत पाठवा. तुमच्या संघटनेला ४-६ महिन्यानंतर सहभागींनी अंमलबजावणीमध्ये किती प्रगती केलेली आहे ते पाहण्यासाठी पाठपुराव्याचे नियोजन करण्याचे काम करण्यास विसरू नका. |